अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.१९ एप्रिल २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २०० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## मुंबई इंडियन्सची हॅटट्रिक, हैदराबादचा १४ धावांनी पराभव

✔ **हैदराबाद** : आज आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सने सनरायजर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात विजय मिळवला. मुंबई इंडियन्सने हैदराबादचा १४ धावांनी पराभव केला. मुंबई संघाने सलग तीन सामन्यांमध्ये विजय मिळवत हॅटट्रिक केली आहे. हैदराबाद संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई इंडियन्स संघ पहिल्यांदा फलंदाजीसाठी उतरला. पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने १९२ धावा केल्या. मात्र लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबाद संघाचा पराभव झाला. मुंबईने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबाद संघ शेवटच्या षटकात ऑल आऊट झाला. मुंबई इंडियन्सने सनरायझर्स हैदराबादचा त्यांच्या घरच्या मैदानावर १४ धावांनी पराभव केला.

**आयपीएल सामना क्र.२६**

Vs

राजस्थान रॉयल्स विरुद्ध लखनौ सुपरजाएंटस्

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : सवाई मानसिंग स्टेडियम, जयपूर

# दिल्लीला उठवले; महाराष्ट्राला उचकवले; यूपीला सटकवले, कर्नाटकाला भटकवले; अदानीच्या चर्चेला बरोबर संपवले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**अमेरिकेतल्या हिंडेनबर्गने जगाच्या पाठीवरील सर्वात श्रीमंतांपैकी एक असणाऱ्या गौतम अदानी या भारतीय उद्योगपतीने अफरातफरी केल्याचा गौप्यस्फोट केला आणि संपूर्ण देश हादरला. कारण भारतात अदानी आणि मोदी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यामुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हाच मुद्दा उचलून धरला आणि त्यातच संसदेचे संपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशन गुंडाळून गेले. यावर काहीच उत्तर देता न आल्यामुळे झालेली नाचक्की आणि देशाच्या कानाकोपऱ्यात सुरू असलेली नको तितकी चर्चा थांबवण्यासाठी सीबीआयची चौकशी लावून राजधानी दिल्लीला चर्चेतून उठवले. राष्ट्रवादीचे फायरब्रँड नेते अजित पवार यांच्या कथित भाजप प्रवेशाच्या चर्चेने संपूर्ण महाराष्ट्रालाच उचकवले. अतिक व अहमदच्या खूनकांडाने संपूर्ण यूपीतील अदानी चर्चेलाच सटकवले. राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या आयाराम-गयारामच्या गदारोळात कर्नाटकाला भटकवले. या संपूर्ण घडामोडींमधून अदानीच्या विषयाला बरोबर संपवण्यात भाजपवाले यशस्वी झाल्याचे चित्र सध्या पाहण्यास मिळत आहे.**



अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावरच हिंडेनबर्गचा रिपोर्ट आला. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्यासाठी विरोधकांना आयतेच हत्यार मिळाले. 'भारत जोडो' यात्रेतील अभूतपूर्व प्रतिसादामुळे फुल्ल फॉर्ममध्ये असलेले राहुल गांधी यांनी तोच मुद्दा उचलला आणि अदानीमित्र पंतप्रधान मोदींवर शरसंधान सुरू केले. संपूर्ण अधिवेशनात सत्ताधारी भाजपच्या तोंडून अदानीमधला अ सुध्दा निघाला नाही. संपूर्ण अधिवेशन अदानींच्या मुद्याभोवतीच फिरले आणि शेवटी नाइलाजास्तव गुंडाळले. त्यानंतर संपूर्ण देशात अदानींचा विषय सुरू झाला. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी अदानीवरून मोदींना टार्गेट केले. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने तर राज्यातील आणि केंद्रातील भाजप सरकारला उघडे पाडण्याचा कार्यक्रमच सुरू केला. या पार्श्वभूमीवर भाजपची होणारी नाचक्की थांबवण्यासाठी आणि देशाचे अदानींवरील लक्ष हटवण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखला गेला आणि त्यात केंद्र सरकारला यश आले. दिल्लीसह उत्तर भारत आणि दक्षिण भारतातील अदानीपुराण तूर्त तरी बंद पाडण्यात केंद्र सरकार यशस्वी ठरले.

### केजरीवालांच्या मागे सीबीआयचा ससेमिरा



हिंडेनबर्गनंतर राहुल गांधी यांच्यासोबतच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अदानीवरून थेट मोदींना प्रश्न विचारला. त्यानंतर लगेचच त्यांच्या मागे सीबीआयचा ससेमिरा लागला. ज्या प्रकरणात केजरीवालांची चौकशी सुरू झाली ते प्रकरण जुने. त्यात काहींना अटक होऊन तपासाने अंतिम टप्पा गाठलेला आहे. तरीही तपासाचा भाग असल्याचे पुढे करून केजरीवालांचे तोंडचे पाणी पळवले. साहजिकच दिल्लीत सुरू असलेली अदानींची चर्चा केजरीवालांच्या चौकशीकडे वळली.


To the point

### अजित पवारांच्या बंडाची वावटळ



महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल शिंदे-फडणवीस सरकार विरोधात गेला आणि त्यात शिंदे गटाचे १५-२० आमदार अपात्र ठरले तरी सरकार पडणार नाही. तरीही सरकार कोसळणार आणि अजित पवार बंड करून भाजपमध्ये जाणार; त्यातून भाजप सरकार तरणार अशा चर्चेची सापसुरळी राष्ट्रवादीच्या पायात सोडली. या दरम्यान राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार ही अफवा असल्याचे सांगत होते. मात्र भाजपवाले बंडाला उत्तेजन देणारी विधाने करत होते. त्यामुळे महाराष्ट्रात अजित पवारांच्या बंडाशिवाय दुसऱ्या कोणत्याच विषयाची चर्चा झाली नाही.

### निवडणुकीशिवाय कर्नाटकात दुसरी चर्चाच नाही



कर्नाटकात भाजप अडचणीत असल्याचे मतदानपूर्व चाचण्यांमध्ये दिसून आले. त्यात अदानीचा मुद्दा निवडणुकीसाठी अडचणीचा ठरू लागला. अशावेळी अदानीच्या मुद्याला बगल देण्यासाठी कर्नाटकात धक्कातंत्राचा अवलंब केला. त्यातून आयाराम-गयारामांचीच चर्चा सुरू झाली. यांचा तिकडे प्रवेश आणि त्यांचा इकडे प्रवेश याशिवाय कर्नाटकात चर्चेला दुसरा विषयच ठेवला नाही. त्यातून अदानींची अदा कुठे परागंदा झाली, हे कन्नडिगांना कळलेच नाही. साहजिकच अदानी हा कर्नाटकातील निवडणुकीचा विषय उरलाच नाही.

### अतिक-अहमदसोबत अदानीच्या चर्चेचा एन्काऊंटर



उत्तर प्रदेशात गँगस्टर अतिक व अहमद यांच्या खूनकांडावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. त्याठिकाणी बहुमताच्या जोरावर अतिक-अहमदचा मुडदा पाडताना अदानीच्या चर्चेचाही एन्काऊंटर करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशच्या गल्लीबोळात सध्या अतिक-अहमद आणि योगी आदित्यनाथ यांच्याशिवाय चर्चेसाठी दुसरा मुद्दाच उरला नाही. अतिकचा मुलगा असदचा एन्काऊंटर झाल्यानंतर दोनच दिवसात अतिक-अहमदला यमसदनी धाडल्यामुळे अदानीपेक्षा आदित्यनाथ हाच यूपीतील चर्चेचा विषय बनला आहे.

## क्रीडा अधिकारी जाधव यांनी पालिकेच्या आदेशाला दाखवली केराची टोपली

**बेकायदा वृक्षतोड प्रकरण; पाच लाखांचा दंड अद्याप भरलाच नाही**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर असलेली पाच झाडे महापालिकेची परवानगी न घेता तोडल्याबद्दल महापालिकेने पंढरपूर तालुका क्रीडा अधिकारी सतेन जाधव यांना प्रति वृक्ष एक लाख रुपये यानुसार पाच लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता. मात्र तो अद्यापपर्यंत न भरून जाधव यांनी महापालिकेच्या कारवाईला चक्क केराची टोपी दाखवली आहे.

शासकीय मैदानातील तोडलेली झाडे चांगल्या स्थितीत होती. कोणाचीही परवानगी न घेता ती तोडण्यात आली. तसेच त्या झाडांच्या लाकडांची परस्पर विक्री करण्यात आली, अशी तक्रार काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. मनीष गडदे यांनी महापालिकेकडे केली होती. वृक्षतोडीची ही घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. त्यावेळी जाधव यांच्याकडे नेहरूनगरच्या मैदानाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली होती. बेकायदा वृक्ष तोडल्याबद्दलची जबाबदारी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने जाधव यांच्यावर निश्चित केली.

त्यानंतर महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी त्यांच्यावर दंडात्मक कारवाईच्या आदेश काढले होते. हे आदेश बजावून २० ते २५ दिवस उलटून गेल्यानंतरही जाधव यांनी पाच लाख रुपये दंडाची रक्कम भरलीच नाही.

एकीकडे शासन पर्यावरण संवर्धनासाठी कोट्यवधी रुपये खर्च करत झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम राबवते. तर दुसरीकडे शासनातीलच एक अधिकारी चांगल्या स्थितीत असलेली झाड तोडतो आणि त्याची परस्पर विल्हेवाट लावतो की बाब गंभीर आहे म्हणून नियमानुसार त्यांना महापालिकेने पाच लाखांचा दंड ठोठावला होता तो भरण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत दिली होती परंतु जाधव यांनी या कारवाईची गांभीर्याने दखल घेतली नाही आता महापालिकेकडून त्यांच्यावर पुढे काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

## आशा भोसलेंना लता मंगेशकर पुरस्कार

✔ **मुंबई** : यंदाच्या 'लता दीनानाथ मंगेशकर' पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ गायिका आशा भोसले या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. गायिका उषा मंगेशकर यांनी या पुरस्कारांची घोषणा केली. शिवाय, विद्या बालन, पंकज उदास, प्रसाद ओक यांच्यासह अनेकांना मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

दिवंगत मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८१ व्या स्मृतिदिनानिमित्त नुकतेच एक प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. चित्रपट आणि नाटक क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेता प्रसाद ओकला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच चित्रपट क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेत्री विद्या बालन विशेष पुरस्कार दिला जाणार आहे.२४ एप्रिल २०२३ रोजी यंदाचा प्रतिष्ठित दीनानाथ पुरस्कार आणि ट्रस्टच्या इतर पुरस्कारांचा वितरण सोहळा पार पडणार आहे. मुंबईतील सायन याठिकाणी असणाऱ्या श्री षण्मुखानंद हॉल इथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



**मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार**

विशेष वैयक्तिक पुरस्कार- पंकज उदास (भारतीय संगीत),
सर्वोत्कृष्ट नाटक- प्रशांत दामले फॅन फाउंडेशनचे गौरी थिएटर्सचे 'नियम व अटी लागू'
श्री सद्गुरू सेवा संघ ट्रस्ट- (समाजसेवेच्या क्षेत्रात समर्पित सेवा)
वागविलासिनी पुरस्कार - ग्रंथाली प्रकाशन - (साहित्य क्षेत्रात समर्पित सेवा)
विशेष पुरस्कार - प्रसाद ओक (चित्रपट आणि नाटक क्षेत्रात समर्पित सेवा)
विशेष पुरस्कार- विद्या बालन (चित्रपट क्षेत्रात समर्पित सेवा)



**विरोधी जोडी, मंदिरात गोडी ...** अक्कलकोट तालुक्यातील राजकारणात विरोधी जोडी असणारे आ. सचिन कल्याणशेट्टी आणि माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे यांनी स्वामी समर्थांच्या दरबारात मात्र गोडी दाखवून एकत्र आरती केली.

## समाधाननगरात गादीच्या कारखान्याला आग; सात लाखांचे नुकसान

✔ सुराज्य/सोलापूर

शहर हद्दीमधील अक्कलकोट रोड परिसरातील समाधान नगरातील गादीच्या कारखान्याला व सिंदीच्या झाडू बनविण्यासाठी एकत्र रचून ठेवलेल्या झाडूंच्या झावळ्यांना आग लागली. मंगळवारी ही घटना घडली.

अग्निशामक दलाने आठ वाहनांनी पाण्याची फवारणी करून आग नियंत्रणात आणली. शॉर्टसर्किटने आग लागल्याचा प्राथमिक अंदाज असून साधारण दोन्ही व्यापाऱ्याचे सात ते आठ लाखाचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली असल्याचे अग्निशामक दलाचे प्रमुख केदार आवटे म्हणाले.अक्कलकोट रोड सूत मिल येथे समाधान नगर येथे नागरी वस्तीतील गादी कारखान्यासह इतर सिंदी झाडू बनविणाऱ्या व्यापाऱ्याच्या दुकानाला मंगळवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीमुळे दोन्ही व्यापाऱ्यांचे साहित्य भक्षस्थानी पडले. गादी आणि सिंदी झाडूचे फडाला लागलेल्या आगीचे लोट या परिसरात पसरले होते. अग्निशामक दलाला माहिती मिळताच आठ वाहनांनी पाण्याची फवारणी करून आग आटोक्यात आणली. शॉर्टसर्किटने आग लागली असावी, असा अंदाज आहे. कारखान्याला लागलेल्या आगीत कोणतीही जीवितहानी नाही. या गादी कारखान्याचे साडेपाच लाखाचे तर झाडू व्यापाऱ्याचे साधारण अडीच लाखाचे नुकसान झाल्याचे श्री आवटे यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




अहो घाबरू नकाऽऽ कार्यक्रमाची पत्रिका आहे ही!

कल्याण
359-76-169

मेन बाजार
246-28-134

## महापालिका करणार शहराचा सर्वंकष सर्व्हेक्षण

▸ मे महिन्यात होणार सुरूवात; १२५ पथके तैनात

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर महापालिका प्रशासनाच्या वतीने मिळकत, नळ कनेक्शन यासह विविध घटकांचा सर्वंकष असा सर्व्हे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू करण्यात येणार आहे. यासाठी १२५ पथके तैनात करण्यात करण्यात येणार असून तीन महिन्यांच्या आत हे काम पूर्ण करण्याचे टार्गेट पथकापुढे असणार आहे.**



महापालिकेच्या वतीने सोलापूर शहरातील सर्व मिळकती, नळ कनेक्शन, ड्रेनेज कनेक्शन, प्रॉपर्टी कार्ड, बांधकाम परवाना, वापर परवाना यासह इतर सर्व माहिती या सर्व्हेक्षण अंतर्गत संकलित करण्यात येणार आहे. घरोघरी जाऊन या सर्व्हेक्षणातील पथके माहिती संकलित करणार आहेत. संबंधित पथकातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्व्हेक्षण करत असताना संभाव्य येणाऱ्या अडचणी यासंदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे.

या सर्व्हेक्षणासाठी घरोघरी येणारे पथक संबंधित मिळकतदारांना आवश्यक असलेली असलेली माहिती विचारणार आहेत. यामध्ये मिळकत कर नोंद आहे का ?, बांधकाम परवाना आहे का?, वापर परवाना आहे का ?, नळ कनेक्शन आहे का?, त्यामध्ये घरगुती की व्यावसायिक?, ड्रेनेज कनेक्शन आहे का? या संदर्भातली माहिती कर्मचारी जाणून घेणार आहेत. ती माहिती गुगल फॉर्म मध्ये संबंधित पथक भरणार आहे. हा गुगल फॉर्म तयार करण्याचे काम संगणक विभाग करणार आहे.

### ■ एक पथक रोज ४० घरांचा सर्व्हे करणार

या सर्व्हेक्षणासाठी एकूण १२५ पथके तयार करण्यात येणार आहेत. हे पथक घरोघरी जाऊन सर्व माहिती संकलित करणार आहेत. त्यानंतर सर्व डाटा एकत्रित करण्यात येईल. ही माहिती गुगल फॉर्म मध्ये भरण्यात येणार आहे. साधारणता : एक पथक रोज ४० घरांचा सर्व्हे करणार आहेत. साधारणतः तीन महिन्यात हे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

### ■ कागदपत्रे दाखवून सहकार्य करावे : आयुक्त



मे महिन्याच्या सुरूवातीला सर्व्हेक्षणाचे काम हाती घेण्यात येत आहे. पथकाने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व माहिती मिळकतदारांनी द्यावयाची आहे. ही माहिती देतानाच टॅक्स पावती, बांधकाम परवाना, वापर परवाना आदी महत्त्वाची कागदपत्रे ही या पथकास दाखवून सहर्का करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी मिळकतदारांना केले आहे. जर कागदपत्र दाखवले नाहीत तर संबंधित बाब अनधिकृत असल्याचे स्पष्ट होईल असेही त्या म्हणाल्या.

## राज्यात बुधवारी ९४९ रुग्णांची नोंद

✔ **मुंबई** : राज्यातील कोरोनाच्या रुग्णसंख्येत काही प्रमाणात वाढ झाल्याचं दिसून आलं आहे. राज्यात आज कोरोनाच्या ९४९ रुग्णांची नोंद झाली असून सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर राज्यात गेल्या २४ तासात ९१२ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत.

राज्यात आतापर्यंत ८०, ०२, ६९० कोविड-१९ रुग्णांना पूर्ण बरे झाल्यानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचा दर ९८.१० टक्के इतका झाला आहे. राज्यात आज कोरोनामुळे सहा जणांना आपला जीव गमवावा लागला असून राज्यातील मृत्यूचे प्रमाण १.८२ टक्के इतकं आहे. या प्रकाराच्या प्रकरणांमध्ये चार मृत्यूची नोंद झाली आहे.

# सत्ता खुर्चीचा खेळ...

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात सध्या गंमत-जंमत सुरू आहे. दिवस उजाडला की, वर्तमानपत्रे चाळल्यानंतर मराठी माणसाची नक्कीच करमणूक होत असेल. सध्या मीडियाचा फोकस राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांच्यावरच आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री जमिनीला पाठ लावेपर्यंत दादा कुठे जातात? कुणाशी बोलतात? त्यांना कोण कोण भेटतात? पडद्याआड काय चालले आहे? याविषयीचे इत्थंभूत वर्णन न्यूज चॅनेलवरून थेट प्रसारणातून लोकांपर्यंत पोहचवले जात आहे. अजितदादांचा एक गट भाजपसोबत जाणार असल्याच्या बातम्या गेल्या आठ दिवसांपासून झळकत आहेत. शिंदे गटातील सोळा आमदारांना न्यायालयाने अपात्र ठरवले तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राजीनामा द्यावा लागेल आणि विद्यमान सरकार कोसळेल. त्यानंतर लगेच सत्तेचा दावा करण्यासाठी भाजपची रणनीती तयार असून अजितदादांचा पाठिंबा घेण्याचा भाजपचा विचार आहे, असे एकंदरीत सध्याचे चित्र आहे. मात्र, आपल्याविषयी उगाच वावड्या उठवल्या जात आहेत. गट घेऊन बाहेर पडण्याची आपली इच्छा बिलकूल नाही.त्यांचे सोळा आमदार अपात्र ठरले तरी शिंदे-भाजप सरकार टिकणार आहे, असे असे स्पष्टीकरण दादांकडून सातत्याने दिले जात आहे तरी देखील दादांविषयीच्या बातम्या अजूनही थडकतच आहेत. आजच्या राजकारणात केव्हाही काहीही होऊ शकते. त्यामुळे न्यायालयाच्या निकालावरच राज्याच्या सत्तेचे पुढचे भवितव्य अवलंबून आहे. दादांच्या भूमिकेवर भाजप नेत्यांनी जे मौन पाळले आहे, ते बरेच काही सांगणारे आहे पण शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी शिवसेनेची जी परखड भूमिका स्पष्ट केली, त्यातून भाजप नेत्यांचे डोळे घडतील काय? असा आमचा सवाल आहे. अजितदादा राष्ट्रवादी सोडून भाजप किंवा शिवसेनेत आलेत तर त्यांचे स्वागत आहे. मात्र राष्ट्रवादीचा गट घेऊन ते भाजपसोबत जाणार असतील तर आम्ही सत्तेतून बाहेर पडू, असा इशारा शिरसाट यांनी दिल्यामुळे भाजपला याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. कारण अजितदादांनी एकदा घात केल्यामुळे विद्यमान उप-मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रिपद घेऊन तोंडघशी पडले होते. सध्या अजितदादा चर्चेचा विषय आहेत. त्यांचा फोन नॉट रिचेबल लागणे हे नवीन नाही. दादांची नाराजी आणि आमच्या सुप्रीम कोर्टाच्या निकालाचा काही संबंध नाही, अशी स्पष्टोक्ती शिरसाट दिली. दादांची नाराजी पार्थ पवारांच्या पराभवापासूनची आहे. राष्ट्रपती राजवट उठवण्यासाठी शरद पवारांनी अजितदादांचा बळी दिला. महाविकास आघाडीच्या मेळाव्यात दादांचे स्थान शोधावे लागतेय. टाईम साधणारा नेता अशी ओळख असलेल्या नेत्याला बोलूही दिले जात नाही. दादांना बोलू दिले असते तर काय झाले असते? ५४ आमदारांचे पाठबळ असलेल्या नेत्याला साईड केले जातेय, हा त्यांचा अपमान आहे, अशा राष्ट्रवादीच्या अंतर्गत बाबी उघड करून शिरसाट यांनी शरद पवारांच्या वर्मावर बोट ठेवले आहे. आघाडीत बिघाडी होत असल्याचे पहायला मिळते. उद्धव ठाकरे आणि अजितदादा यांच्यात आडवे विस्तव जात नाही. शिरसाट म्हणतात त्याप्रमाणे ५४ आमदार असताना अजितदादांना पहिले स्थान नाही मात्र ठाकरे यांना सिंहासनासारखे आसन वज्रमूठ सभेत दिले गेले.ही सल अजितदादांना सहन होत नसावी. आघाडीतील सगळ्याच पक्षात चलबिचल आहे. १५ आमदार असलेला पक्ष (उद्धव ठाकरे) मार्गदर्शन करत असल्याने दादांची नाराजी नक्कीच असावी. अमित शहा हे मुंबईला येऊन गेल्यानंतर लागलीच भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व आ. शेलार हे तातडीने दिल्लीला गेल्याचे वृत्त झळकताच 'दाल में कुछ काला है', अशी चर्चा होणे स्वाभाविकच आहे. समजा अजितदादा भाजपसोबत गेले तर शिंदे गटाचे काय होणार? ४० आमदार सोबत घेऊन आलेल्या शिंदे यांच्याकडून कोणती भूमिका घेतली जाणार? हाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. आयोगाने शिवसेना शिंदे गटाला दिल्यामुळे ते ठाकरे समर्थकांना जवळ करतील, असे वाटत नाही. ठाकरे हे देखील भाजप व शिंदे गटाला जवळ करतील, असे वाटत नाही. तेव्हा राज्यातील राजकीय स्थिती लटकती दिसते आहे. राज्यापुढे अनेक प्रश्न गंभीर होत असताना अस्थिरतेचे वातावर निर्माण करण्यात काहीच अर्थ नाही. मुळात आघाडीची सत्ता फोडण्याची गरज नव्हती, असा प्रश्न राज्यातून फडणवीस यांना विचारला जाऊ लागला आहे. ठीक आहे, लोकशाहीचा भाग म्हणून भाजपने ठाकरे यांच्याकडून सत्ता हिरावून घेतली. आता तरी फोडाफोडीचे राजकारण फडणवीस यांनी करू नये, असा सूर सर्वत्र उमटत आहे. बघू या सत्ता खुर्चीच्या खेळात कोण बाजी मारतोय?

सामाजिक

# स्वप्नांचा चुराडा झालाय त्याचे काय?

**भरती प्रक्रियेबाबत बोलताना स्पर्धा परीक्षा समन्वय समितीचा सदस्य महेश घरबुडे म्हणाला की, 'राज्यात २०१४ पासून नोकर भरतीला ग्रहण लागले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ७२ हजार नोकर भरतीची घोषणा केली होती पण ती अजून देखील पूर्ण झालेली नाही. सध्या राज्यात शिंदे-फडणवीस सरकार येऊन ८ महिने उलटले आहेत. या सरकारच्यावतीने आता नोकरभरतीत जागांचा आकडा वाढवून ७५ हजार इतका करण्यात आला आहे. परंतु सध्या परिस्थिती पोलीस भरती सोडली तर कोणत्याच परीक्षेची प्रक्रिया सुरू झालेली नाही. हे सरकार फक्त शासन निर्णय काढण्याचं काम करत आहे. आमचं स्पष्ट मत आहे की सरकार नोकरभरतीत बाबत सपशेल अपयशी ठरले आहे. लवकरात लवकर परीक्षा घेतल्या नाहीत तर राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या रोषाला सरकारला सामोरे जावे लागणार आहे.**

पुण्यात मागील पाच वर्षांपासून अभ्यास करणारा राजू जाधव बोलताना सांगत होता. मागील पाच वर्ष सरळसेवा भरती प्रक्रियेची तयारी करतो आहे. २०१९ साली ज्यावेळी मी सरळसेवा परीक्षा घेण्याचं तत्कालीन सरकारने जाहीर केलं. त्यावेळी आई-वडिलांजवळ हट्ट करून पुण्यात अभ्यासासाठी आलो. आई-वडील गावी दहीवडीला असतात. दोघेही मोलमजुरी करतात. २०१९ साली मोठ्या बहिणींचं लग्न झाल्यानंतर आई-वडिलांच्या डोक्यावर कर्ज झालं होतं. तरीदेखील माझ्या हट्टापायी मला पुण्याला पाठवण्याचा दोघांनी निर्णय घेतला. ज्यावेळी मी पुण्याला यायचा निर्णय घेतला. त्यावेळी कोणत्याही परिस्थितीत सरळसेवा भरती प्रक्रियेत उत्तीर्ण व्हायचं आणि नोकरीला लागायचं. आई-वडिलांनी आत्तापर्यंत ज्या हालअपेष्टा सोसल्या त्या पुन्हा त्यांच्या वाट्याला नको म्हणून एमपीएससी किंवा पोलीस भरतीचं खूळ डोक्यात न घेता सरळसेवा भरतीच्या माध्यमातून एका परीक्षेत पास होऊन सरकारी नोकरीला लागण्याचा चंग मनात बांधून मी पुण्यात आलो होतो. आज पुण्यात येऊन मला पाच वर्षे होत आली परंतु ना सरळसेवेची भरती झाली ना मला नोकरी लागली. आता सरकारच्यावतीने २०१९ साली जिल्हा परिषदेच्या सरळसेवे अंतर्गत रिक्त जागांसाठी मागवलेल्या अर्जाचे शुल्क विद्यार्थ्यांना परत मिळण्याबाबत हालचाली सुरू असल्याची बाब निदर्शनास आली आहे. मला त्यांना सांगणं आहे. पैशांचं जाऊ द्या हो... पाच वर्षे दाखवलेल्या स्वप्नांचा चुराडा केलात त्याचं काय? त्याचं उत्तर कोण देणार?

सोलापूरचा प्रमोद साळवे रखडलेल्या सरळसेवेच्या जागांबाबत बोलताना म्हणाला की, पुण्यात मी सरळसेवेच्या माध्यमातून जिल्हा परिषदेत लिपिक, तलाठी, आरोग्यसेवक जे पदरात पडेल ते पद मिळवण्यासाठी आलो होतो. घरून पैसे अगदी मोजके यायचे म्हणून केवळ एक वेळ जेवण करत होतो. दुसऱ्या वेळेच्या डब्याचे पैसे लायब्ररीसाठी खर्च केले होते. दिवस-दिवस लायब्रीत पुस्तक वाचत बसायचो. परिस्थिती हलाखीची असताना देखील काही दिवस क्लासेस लावले. अभ्यास जोरदार सुरू होता. ज्यावेळी मी क्लास लावला त्यावेळी माझ्यासोबत असलेल्या विद्यार्थ्यांपैकी जवळपास ९५ टक्के मुलं ही गरीब कुटुंबातून आलेली आहेत हे माझ्या लक्षात आलं होतं. डीएड, बीएड करणाऱ्यांची यात मोठी संख्या होती. प्रत्येकाच्या डोक्यात मिळेल ती सरकारी नोकरी पदरातून पाडून घेणं हे पक्क ठरलं होत. ज्यावेळी २०१९ची परीक्षा रद्द झाली त्यानंतर मात्र क्लासमध्ये १० टक्के मुलं शिल्लक राहिली. त्यांना आशा होती की परीक्षांच्या तारखा जाहीर होतील आणि त्यानंतर आपण नोकरीला लागू शकू. मात्र, पाच वर्षे उलटले तरी हाती काहीच लागलं नाही.



राज्यातील जिल्हा परिषदांमधील गट क च्या विविध १८ संवर्गातील रिक्त पदांच्या महाभरतीची प्रक्रिया रद्द झाल्याने, या परीक्षेला अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना त्यांचे परीक्षा शुल्क परत दिले जाणार आहे. यानुसार ग्रामविकास विभागाने पहिल्या टप्प्यात एकूण शुल्कापैकी ६५ टक्के रक्कम ही सर्व जिल्हा परिषदांकडे वर्ग केली आहे. यापुढील शुल्क परत करण्याची प्रक्रिया आपआपल्या जिल्हा परिषदांमार्फत केली जाणार आहे. राज्य सरकारने जिल्हा परिषदांमधील विविध १८ संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी मार्च २०१९ आणि ऑगस्ट २०२१ मध्ये महाभरती प्रक्रिया सुरू केली होती. या दोन्ही जाहिरातीनुसार पात्र उमेदवारांनी यासाठी परीक्षा शुल्कासह उमेदवारी अर्ज दाखल केले होते. परंतु पुढे ही भरती प्रक्रिया वादग्रस्त ठरल्याने ही महाभरती रद्द केली होती. भरती प्रक्रिया रद्द झाल्याने यासाठी भरलेले परीक्षा शुल्क परत करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. त्यानुसार लवकरच विद्यार्थ्यांना त्यांचे परीक्षेसाठीचे शुल्क परत मिळण्याची शक्यता आहे. या भरती प्रक्रियेमध्ये एकूण ३४ जिल्हा परिषदांचा समावेश होता. १८ संवर्गातील रिक्त पदांसाठी राबवण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत एकूण ३३ कोटी ३९ लाख ४५ हजार २५० रुपये इतका निधी जमा झाला होता. सध्या जिल्हा परिषदेकडे यातील २१ कोटी ७० लाख ६४ हजार ४१३ रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर विभागातील संवर्गाच्या १८ हजार ९३९ पदे भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी आता मार्च २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे यापूर्वी अर्ज भरलेल्या सर्व उमेदवारांना ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत जिल्हा परिषद सेवेत सरळसेवेने नियुक्तीसंदर्भात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व जाहिरातींकरिता अर्ज करण्यास पात्र करण्यात आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे संबंधित परीक्षा ही टी.सी.एस, आय.बी.पी.एस या कंपन्यांद्वारे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. परीक्षा एकाच वेळी पार पडावी यासाठी आता संबंधित परीक्षेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक प्रणाली उपलब्ध करून देण्यात येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२० साठीची पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, मैदानी चाचणी तसेच मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाली आहे परंतु अद्यापही या परीक्षेचा निकाल एमपीएससी मार्फत जाहीर करण्यात आलेला नाही. त्याचसोबत २०२१ साठीची पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा झालेली असून अद्याप पीएसआय साठी मैदानी चाचणी व मुलाखत बाकी आहे. सामान्यता मुख्य परीक्षेनंतर तीन महिन्यात मैदानी चाचणीचे वेळापत्रक जाहीर होत असते परंतु चार महिने उलटूनही हे वेळापत्रक जाहीर झालेले नाही. सप्टेंबर २०२२ मध्ये २०२२ साठीची पूर्व परीक्षा घेण्यात आली होती परंतु त्याचा निकाल अद्याप जाहीर झालेला नाही. त्यामुळे मुख्य परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झालेले नाही. जवळपास दोन वर्षापासूनच्या या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले नसल्यामुळे अनेक विद्यार्थी या निकालांच्या प्रतीक्षेत आहेत. आयोगामार्फत या इतक्या परीक्षा आणि निकाल प्रलंबित असताना नुकतेच २०२३ साठी पूर्व परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा ३० एप्रिलला होणार आहे. परंतु ही परीक्षा देण्यापूर्वी आधीच्या परीक्षांचे निकाल जाहीर करणे गरजेचे असून त्या निकालानंतरच विद्यार्थ्यांना पुढील दिशा निश्चित करण्यात येणार आहे, राज्यातील एकंदरीत भरती प्रक्रियेची सध्याची परिस्थिती पाहता विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. राज्यातील अशा लाखो युवकांच्या स्वप्नांचा चुराडा केलेल्या सरकारने किमान आता तरी लवकरात लवकर परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा...'

**- निलेश बुधावले.**

टुडेज् ब्लॉग

# कडक उन्हात लोकांची अग्नी परीक्षा

गेल्या काही दिवसांपासून उन्हाच्या तीव्र झळा बसत आहेत. अशा वेळी मैदानातील कार्यक्रम टाळायला हवे. याकडे आयोजकांचे लक्ष पाहिजे. कार्यक्रम घेणे तातडीचे आहे, तर ते सभागृहात घेता येतील. पण खुले मैदान अजिबात नको. नेमका तोच भाग नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र भूषण' सोहळ्याच्या संदर्भात पाहण्यास मिळाला. लाखो लोक आग ओकणाऱ्या सूर्याच्या खाली बसले होते. घराच्या खिडकीतून दुपारच्या वेळी बाहेर पाहिले तरी नकोसे वाटते. तर तासन्तास उन्हात बसलेल्या त्या मंडळींनी इतक्या तीव्र झळा कशा सोसल्या असतील ? माणूस म्हणून प्रथम यांचा विचार केल्यावर असे लक्षात येते की, आयोजकांना कार्यक्रम मैदानातच घ्यायचा होता तर त्यांनी भव्य मंडप टाकायला हवा होता. मात्र तसे न दिसता व्यासपीठावर उपस्थित असलेले सन्माननीय व्यक्ती सावलीखाली तर होत्याच शिवाय त्यांच्या आसन व्यवस्थेच्या मागे कूलरची व्यवस्था असल्याचे दिसत होते. हा विरोधाभास माणुसकी या नात्याने निश्चितच खटकणारा होता. एखाद्याला शासन करण्यासाठी कडक उन्हात तासन्तास बसवून ठेवल्याप्रमाणे उपस्थित लक्षावधी जनसमुदायाचे चित्र दिसत होते. समोर कडकडीत ऊन असल्याचे दिसत आहे आणि त्यात व्यासपीठावरून होणारी भाषणे म्हणजे कहरच होय. उन्हात बसून भाषण ऐकणे किती अशक्य आहे? याचा अनुभव घेण्यासाठी सावली सोडून उन्हात बसल्याशिवाय त्यांच्या वेदना कळणार नाहीत. ४०-४२ अंश तापमान आहे याचा भाषणात केवळ उल्लेख करून काय उपयोग? कारण त्याचे चटके उन्हात बसलेल्यांनी अनुभवले आहेत. ज्याचे जळते त्यालाच कळते, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

'आताच्या उन्हात ऐन दुपारच्या वेळी कोणी कितीही रुपयांची पैज लावली आणि अमुक करण्यास सांगितले तरीही मी करणार नाही', असे बोलणारे अनेक जण आहेत. तसे ते वागतातही. हे विशेष. उन्हाच्या कडाक्यासमोर पहेलवान जरी असला तरी तो ही टिकणार नाही. कारण कडक ऊन कोणत्याही प्रकृतीच्या व्यक्तीला सोसणारे नसते. हे साधे गणित



आहे. निसर्गापुढे मानवी शहाणपण चालत नसते. निसर्गाची अनुकूलता, प्रतिकूलता यांचा बारकाईने अभ्यास करून मगच पुढचे पाऊल टाकणे हितावह असते. अन्यथा त्याचे नकारात्मक परिणाम निष्पाप लोकांना भोगावे लागतात. अतिमहनीय व्यक्ती येणार असतात तेव्हा त्या कार्यक्रम स्थळाला पोलीस छावणीचे स्वरूप आलेले असते. सुरक्षेचा काटेकोरपणे अभ्यास झाला. आलेल्या महनीय व्यक्ती सुखरूपरित्या त्यांच्या पुढील नियोजित स्थळी गेल्या. मात्र, तासन्तास डोक्यावर सूर्याच्या झळा सोसलेल्या व्यक्ती मात्र मैदानातच चक्कर येऊन पडल्या. कार्यक्रमानंतरचे हे दृश्य मन हेलावणारे होते. जेव्हा कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या काही सदस्यांचा मृत्यूच्या बातम्या येऊ लागल्या तेव्हा खरोखरच संताप आला. कारण म्हणजे ती मंडळी विश्वासाने कार्यक्रम स्थळी आली खरी पण त्यांचा विश्वास सार्थ करण्यास आयोजक अपयशी ठरले. आलेल्या जीवांच्या विश्वासावर शंका घेण्यास तीळ मात्रही वाव नाही. उलट तासन्तास उन्हात बसलेल्या त्या जीवांप्रती मनोभावे आदर वाटतो. तसेच त्यांचा संयमीपणा लक्षवेधी ठरला.

देश, काळ आणि परिस्थिती लक्षात घेत कार्य केले पाहिजे. तसे केले नाही तर दुधात मिठाचा खडा पडलाच समजायचे. कार्यक्रम भव्यदिव्य झाला. पण त्याला निष्पाप जीवांच्या बळींचे गालबोट लागले ते कायमस्वरूपीचे. याची भरपाई होऊ शकत नाही. मानवता हाच श्रेष्ठ धर्म असल्याचे महाराष्ट्र भूषण सोहळ्यात महाराष्ट्र आणि जगाला दिसले नाही. जे दिसले त्यावरून मानवता धर्म मनात सखोलपणे रुजवण्यासाठी कठोर प्रयत्न करणे अत्यावश्यक असल्याचे अधोरेखित झाले आहे.

**- जयेश राणे, मुंबई.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - ३



वीरशैवसिद्धांताप्रमाणे जेव्हा श्रीगुरु शिष्याला इष्टलिंग प्रदान करतात तेव्हा त्याचा शरीराने शिवाशी संबंध जोडला जातो. एकदा लिंगधारण केले की, त्याचा कधीही त्याग केला जात नाही. मृत्यूनंतर देखील त्याच्या प्रेताची इष्टलिंगासोबत समाधीक्रिया केली जाते. दीक्षेनंतर अशाप्रकारे शरीराने शिवाशी नित्यसंबंध जोडला जातो.

श्रीगुरु जेव्हा पंचाक्षरी मंत्राचा उपदेश करतात, तेव्हा मंत्रजपाने वाणीचा शिवाशी संबंध जोडला जातो. मंदिरात, तीर्थक्षेत्री, पर्वतशिखरावर जप करावा असे शास्त्रात सांगितले आहे. परंतु भगवंताचे नामस्मरण करण्यासाठी कसलेही स्थळकाळाचे बंधन नाही. कुठेही आणि कधीही ते केले तरी चालते. परंतु मंदिरात, तीर्थक्षेत्री अथवा पर्वतशिखरावर जप केला तर त्याचे अधिक फळ मिळते, असे शास्त्र का बरे सांगते? तर तेथे जप करताना तेथील प्रसन्न परिसराचा प्रभाव आपल्या मनावर पडतो आणि मन अधिक एकाग्र होते.

घरात जप केला तर सांसारिक व्यवधाने त्यात अंतराय उत्पन्न करु शकतात. मग ज्यांना मंदिरात, नदीतीरावर, तीर्थक्षेत्री अथवा पर्वतशिखरावर जाणे शक्य होत नाही, त्यांनी जप करु नये काय? तर असे नाही. त्या स्थितीत आणि आहे त्याच ठिकाणी तुम्ही जप करु शकता. जप अखंड चालू पाहिजे. जेवढे श्वास आपण घेतो तेवढे नामस्मरण आपल्याकडून घडले पाहिजे. जप करणे म्हणजे वाणीने भगवंताशी संबंध जोडणे होय. याप्रमाणे जेव्हा तुम्ही भावलिंगाची आणि प्राणलिंगाची मानसपूजा करता तेव्हा तुमच्या मनाचा भगवान शिवाशी संबंध जोडला जातो.

अशाप्रकारे शरीर, वाणी आणि मन या त्रिकरणांचा शिवाशी संबंध जुळल्यावर ही त्रिकरणे पवित्र होतात. वेदात इष्टलिंगाला 'पवित्र' अशी संज्ञा दिलेली आहे. इष्टलिंगाच्या संपर्कामुळे शरीर पवित्र होते. मन जेव्हा भगवान शिवाचे चिंतन करु लागते तेव्हा तेदेखील पवित्र आणि प्रसन्न होते. ज्या मनात ज्ञानरुप आणि आनंदरुप भगवंताचे चिंतन चाललेले असते तेथे दु:ख प्रवेश करु शकत नाही.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## चक्रव्यूहात केजरीवाल

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल रविवारी दारू धोरण प्रकरणी चौकशीसाठी सीबीआय कार्यालयात गेले होते.

दिल्ली सरकारने २०२१-२२ मध्ये नवीन उत्पादन शुल्क धोरण आणले होते, त्यात अशी तरतूद करण्यात आली होती की दारू दुकानावर सरकारची मालकी नसावी. याला विरोधकांनी अन्यायकारक, बेकायदेशीर आणि मनमानी म्हंटले याउलट दिल्ली सरकारने याला महसूल वाढवणारे, काळाबाजार रोखणारे आणि माफियांची पकड संपवणारे म्हंटले, पण मुख्य सचिवांनी दिल्लीच्या एलजींना पाठवलेल्या अहवालानंतर अवाजवी लाभ देण्यासारख्या गोष्टी समोर आल्या. जाणीवपूर्वक नियमांचे उल्लंघन आणि महसुलात मोठी घट झाल्याच्या आरोपांना दिल्ली सरकार उत्तर देऊ शकले नाही. यानिमित्ताने नुकताच राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळालेल्या 'आप'च्या नेत्यासाठी हा कसोटीचा काळ आहे. तथापि, ना सीबीआय/ईडी चक्रव्यूह आहे ना केजरीवाल अभिमन्यू.

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

## मैदानी खेळ कमी होत चालले

पूर्वी विटीदांडू, खोखो, आट्यापाट्या, हुतूतू असे मैदानी खेळ मुले खेळत असत या खेळांना पैसाही लागत नसे. आजकाल सर्व जमाना बदललेला आहे. आजकालच्या मुलांना क्रिकेट इ. स्पोर्ट्सचे वेड लागले आहे. विशेष म्हणजे स्पोर्टस आरोग्याच्यादृष्टीने धोकादायक खेळ आहे. पण याची उलाढाल मात्र अब्जावधी रुपयांची आहे. एकट्या भारतात इ स्पोर्ट्सची उलाढाल ४ कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. येत्या ३ ते ४वर्षात ही उलाढाल १४ कोटी डॉलर्स होईल, असा अंदाज आहे. गेल्या दोन वर्षात देशभरात कोरोना मोठ्या प्रमाणात होता. त्यामुळे इ-स्पोर्टसचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. २०२१ मध्ये भारतात इ-स्पोर्टस खेळणारांची संख्या दीड लाख होती. २०२२ मध्ये ही संख्या ६ लाख झाली. या स्पोर्ट्सचा अतिरेक आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक आहे. शाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मैदानी खेळाचे महत्व समजावून सांगावे तसेच त्यांना इ स्पोर्ट्स आरोग्याच्या दृष्टीने कसे घातक आहेत, हे सुद्धा पटवून द्यावे तरच आत्ताची मुले आरोग्य संपन्न होतील. प्रत्येक घरातील पालकांचा सुद्धा याबाबतीत मोठा सहभाग हवा.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# 'तोंडपाटीलकी'नडली...

**राज्याच्या राजकीय पटलावरील मोकळ्या ढाकळ्या स्वभावाचे व्यक्तिमत्त्व. कोल्हापुरातून मुंबईत गेलेल्या एका गिरणी कामगाराच्या मुलाने कोणतेही राजकीय बाळकडू किंवा कोणतीही राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी नसतानाही राज्याच्या राजकारणात मारलेली मजल निश्चितच राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यांसाठी एक रोडमॅप ठरावा, अशीच आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केलेल्या चंद्रकांत पाटील यांचे आज ज्यांच्या हातात भाजप पूर्णत: सामावला आहे त्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्याशी त्यांचे अनेक दशकांचे संबंध आहेत. अमित शाह यांची सासुरवाडी कोल्हापूर असल्याने आणि चंद्रकांत पाटील सुद्धा मूळचे कोल्हापूरचे असल्याने दोघांमधील स्नेहाचे संबंधही सर्वश्रुत आहेत.**

भाजपची मातृशाखा असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शब्द प्रमाण मानून काम करणारे तसेच आयुष्यातील उमेदीच्या काळापासून ते आज पक्षाला सोन्याचे दिवस आणून देणाऱ्यांमध्ये राज्यातील हाताच्या बोटावरील मोजक्या नेत्यांमध्ये ज्यांचा समावेश होतो, तेच चंद्रकांत पाटील. आयुष्याच्या साठीमध्ये उत्तुंग राजकीय यशाने कारकिर्द गाजवण्याऐवजी सलग वादग्रस्त वक्तव्ये करून स्वत:चे कारण नसताना हसे करून घेत आहेत का? अशी शंका येऊ लागली आहे.

चंद्रकांत पाटील यांनी १९८० च्या दशकात अभाविपमधून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी प्रचारक म्हणूनही काम केले. ते १३ वर्ष संघाचे प्रचारक होते. त्यांना संघाकडून पश्चिम महाराष्ट्रात काम करण्याची संधी मिळाली. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्येही ते सक्रिय होते. २००५ मध्ये त्यांना मातृशाखेतील कामाचे बक्षीस मिळून भाजपत संधी मिळाली. त्यांनी दोन वेळा पुणे पदवीधरमधून नेतृत्व केले. त्यानंतर त्यांना २०१४ मध्ये त्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली. त्यानंतर २०१९ मध्येही त्यांना संधी मिळाली होती. त्यांनी एक वेळा मुख्यमंत्रिपदाची



इच्छा सुद्धा व्यक्त केली होती. मात्र, याच वक्तव्यामुळे भाजपमध्ये त्यांना विरोधक निर्माण झाले का? अशीही चर्चा आहे. राज्यात सत्तांतर झाल्यानंतरही त्यांना शिवसेनेकडील खाते देण्यात आले. भाजप प्रदेशाध्यक्षपदही त्यांच्याकडून तातडीने काढून घेण्यात आले. यावरून भाजपमध्येही त्यांच्याविरोधात अदृश्य महाशक्ती सुद्धा तितक्याच ताकदीने काम करत असल्याचे दिसून येते.

गेल्या काही दिवसांपासून म्हणण्यापेक्षा गेल्या दीड वर्षांपासून चंद्रकांतदादांचे वादग्रस्त वक्तव्य आणि वाद समीकरण होत गेले आहे. ज्या सोशल मीडियाचा वापर करून भाजपने विरोधकांना नेस्तनाबूत करून टाकले, तोच सोशल मीडिया चंद्रकांतदादा पाटील यांच्यावरही उलटला आहे. कोणताही सारासार विचार न करता, त्याचे पडसाद काय उमटतील? याचा विचार न करता त्यांच्या तोंडातून राज्याची अस्मिता असणारे महापुरुष सुटले नाहीत. आता त्यांनी बाबरी पाडण्यात एकही शिवसैनिक नव्हता असे म्हणत बाळासाहेब ठाकरेंनाच लक्ष्य केल्याने अत्यंत स्नेहाचे संबंध असलेल्या थेट अमित शाह यांचीही नाराजी ओढवून घेतल्याची चर्चा आहे. राज्यातील भाजप नेत्यांनी सुद्धा त्यांच्यापासून अंतर राखले.

चंद्रकांतदादा यांच्याकडून सातत्याने अत्यंत वादग्रस्त वक्तव्ये झाली आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरुषांवरील वक्तव्याने चंद्रकांत पाटील अडचणीत आले. फक्त अडचणीत न येता त्यांच्या तोंडावर पुण्यात शाईफेकही झाली. शाईफेक झाल्यानंतर व्हिडिओ चित्रित करणाऱ्या पत्रकारालाच लक्ष्य केल्याने चंद्रकांत पाटील आणखी अडचणीत आले. त्यानंतर पोलिसांचे निलंबन आणि पत्रकारावरील कारवाई मागे घेण्याचं त्यांनी आवाहन केलं. शेवटी त्यांना माफी मागून वादावर पडदा टाकावा लागला.

महापुरुषांवर वादग्रस्त वक्तव्ये करून चंद्रकांत पाटील यांनी कोणताही धडा न घेता त्यांनी सातत्याने विरोधी पक्षातील नेत्यांवरही कधी एकेरी, तर कधी वादग्रस्त वक्तव्ये करत त्यांनी स्वत:ला आणखी अडचणीत आणून ठेवले आहे. यामध्ये सुप्रिया सुळे, संजय राऊत, नाना पटोले, रवींद्र धंगेकर यांच्यावरील टीकेने त्यांना बॅकफूटवर जावं लागलं आहे.सततची तोंडपाटीलकी त्यांना नडली

**- परशराम पाटील.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



# पद्मश्री इदाते यांचा सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे सत्कार

✔ सुराज्य/सोलापूर

भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष तथा भारत सरकारच्या निती आयोगाच्या उपसमितीचे सदस्य भिकुजी उर्फ दादा इदाते यांचा सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे मंगळवारी मुख्य कार्यालयात सत्कार करण्यात आला.

भटक्या विमुक्त जाती जमातींच्या उत्कर्षासाठी अनेक दशकांपासून सामाजिक कार्य करणाऱ्या दादा इदाते यांना भारत सरकारने पद्मश्री देऊन सन्मानित केले. त्यानिमित्त जनता बँकेतर्फे हा सत्कार करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, सोलापुरी चादर, नॅपकिन बुके देऊन पद्मश्री दादा इदाते यांचा सन्मान झाला.

यावेळी सोलापूर जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी, सर्व संचालक प्राचार्य गजानन धरणे, जिल्हा सरकारी वकील ड. प्रदीपसिंह राजपूत, आनंद कुलकर्णी, सी.ए. गिरीश बोरगावकर, पुरुषोत्तम उडता, रवींद्र साळे, चंद्रिका चौहान, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य अजित देशपांडे, पेंटप्पा गड्डम, माजी संचालक चंद्रकांत गडेकर, उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, उपसरव्यवस्थापक आनंद जोशी, उपसरव्यवस्थापक अनंत घाटे, सहाय्यक सरव्यवस्थापक मकरंद जोशी, प्रशासन विभागातील अधिकारी मदन मोरे, आनंद डिंगरे तसेच सर्व शाखांचे शाखाधिकारी उपस्थित होते.

प्रशासन विभागातील अधिकारी मदन मोरे यांनी सूत्रसंचालन तर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युगपरिवर्तनाचे महानायक : पद्मश्री इदाते

✔ सुराज्य/सोलापूर

**समाजातील शोषित, पीडित वर्गासाठी महान कार्य करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे युग परिवर्तनाचे महानायक आहेत, असे प्रतिपादन भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे माजी अध्यक्ष तथा भारत सरकारच्या नीती आयोगाच्या उपसमितीचे सदस्य भिकुजी उर्फ दादा इदाते यांनी केले.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विवेक विचार मंच व शाहू शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात आयोजित व्याख्यानावेळी ते बोलत होते. 'समग्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सरकारी वकील ड. प्रदीपसिंह राजपूत, विवेक विचार मंचाच्या जिल्हा संयोजक अश्विनी चव्हाण, शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आवळे उपस्थित होते.

पद्मश्री इदाते म्हणाले, ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लहानपणी समाजातून अनेक ठिकाणी विरोध झाला, त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती केली. ज्यांना शिक्षणासाठीही अनेक अडचणी निर्माण झाल्या, अशा आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठातील सर्वात



विद्वान विद्यार्थी अशी ओळख निर्माण केली. त्यांचा हा प्रवास प्रत्येकासाठी स्फूर्ती देणारा आहे. स्वतंत्र भारतातील प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आणि प्रत्येकाच्या मताचे मूल्य समान असावे असा विचार डॉ. आंबेडकर यांनी मांडला. त्यांच्या कार्यामुळेच दीनदलित म्हणून हिणवल्या गेलेल्या समाजातील व्यक्तीलाही भारताच्या सर्वोच्चपदी विराजमान होता आले.

ओबीसी समाजाला घटनात्मक संरक्षण मिळवून देणे, महिलांसाठीची सर्वोत्तम धोरणे आखणे, नद्या जोडण्याचा विचार देशासमोर मांडणे, १५ मोठी धरणे बांधणे, वीज, पाणी, रस्ते, ऊर्जा साक्षरता, जलसाक्षरता याबाबत प्रभावी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले. त्यांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समग्र होता, असेही इदाते यांनी सांगितले.

यावेळी सी. ए. सुनील इंगळे, संतोष कुलकर्णी, प्राचार्य गजानन धरणे, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, रोहिणी तडवळकर, पद्माकर कुलकर्णी, प्रा.डॉ. संतोष राजगुरू, डॉ. नरसूबाई गदवालकर, डॉ. प्रशांत कांबळे, अरुण कराड, ओंकार शेटे आदी उपस्थित होते.

विवेक विचार मंचाच्या जिल्हा संयोजक अश्विनी चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. कोषप्रमुख श्रीधर खेडगीकर यांनी सूत्रसंचालन तर शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आवळे यांनी आभार प्रदर्शन केले.



## मंगळवेढ्यात स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा साजरा

✔ **मंगळवेढा** : शहरासह संपूर्ण तालुक्यात श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज यांची पुण्यतिथी मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. राधानंद स्वामी महाराज श्री स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट ढवळस रोड, दामाजी नगर, मंगळवेढा येथे रविवार दिनांक १६ ते १८ रोजी विविध भजनीं मंडळाच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. १६ रोजी स्वामी चरित्र सारामृत पारायण तसेच रेणुका माहिला भजनी मंडळाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. सोमवार दिनांक १६ रोजी स्वामी समर्थ बाल भजनी मंडळ यांनी आपले भजन सादर केले. मंगळवार १८ रोजी दुपारी श्री स्वामी समर्थ भजनी मंडळ मंगळवेढा यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला. दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. पुष्पवृष्टीनंतर महाप्रसादाचा कार्यक्रमाने सांगता झाली. हजारो भाविकांनी पुष्पवृष्टीचा लाभ घेतला. घोडके महाराज उर्फ राधानंद स्वामी महाराज, ह.भ.प. हरिचंद्र महाराज उर्फ धनाजी घोडके या मठामध्ये सातत्याने विवीध धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन करीत असतात. मंगळवेढा शहरातील स्वामी मंदिरात देखील पुण्यतिथीचा उत्सव हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला.

## राष्ट्रवादी सेवादलाच्या वतीने फक्त महिलांसाठी रोजा इफ्तार पार्टी

✔ **सोलापूर** : सोलापूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस सेवादल आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अर्बन सेलच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही गवळी वस्ती येथील हनुमान मंदीरात महिलांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. रमजान महिना म्हटले की अनेकजण रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करतात. परंतु राष्ट्रवादी कॉंग्रेस सेवा दल आणि अर्बन सेलच्या वतीने दरवर्षी केवळ महिलांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. फक्त महिलांसाठी रोजा इफ्तार पार्टी पार पडली. यामध्ये सर्व धर्मातील आणि समाजातील महिलांना आमंत्रित करण्यात आले होते. राष्ट्रवादीच्या नेता सायरा शेख यांनी यावेळी दुआ पठण केली तर सूमैया गोलंदाज यांनी कार्यक्रम घेण्यामागील उद्देश सांगितला. या कार्यक्रमास सिकदर गोलदाज विदया शिंदे, लता ढेरे, रेखा सपाटे, मनिषा गवळी, फुलारी भाभी, हिना गोलदाज, ताबोळी, शेख, गीता पवार, सुशिला पवार, जयश्री चौरे आदींसह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## वनपरिक्षेत्र कार्यालयात गैरव्यवहार; कारवाईसाठी उपोषण

✔ **सांगोला** : सांगोला वनपरिक्षेत्र कार्यालयामध्ये ५० कोटीचा गैरव्यवहार झाल्याने हरिभाऊ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून सांगोला तहसील कार्यालयासमोर आज सहा दिवस झाले उपोषण सुरू आहे परंतु अद्याप सांगोला तहसीलदार अभिजीत पाटील यांच्याकडून कोणत्याच प्रकारची कारवाई झाली नाही किंवा उपोषण करणाऱ्यांना विचारपूस सुद्धा करण्यात आली नाही .त्यामुळे इथून पुढे आमरण उपोषण सुरूच राहील अशी माहिती कॉंग्रेसचे नेते हरिभाऊ पाटील यांच्याकडून देण्यात आली. वनपरिक्षेत्र कार्यालय, सांगोला येथील सन २०२०-२१ २०२१ २२ २०२२-२३ या कालावधीमध्ये या कार्यालयाने अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करून ई-निविदा न करता अधिकाराचा गैरवापर करून मनमानी करून सांगोला तालुक्यासाठी शासनाकडून वन विभागासाठी वरील कालावधीमध्ये अंदाजे ५० कोटी रूपयेच्या आसपास निधी प्राप्त झालेला असून या निधीचा गैरवापर करून वनक्षेत्रामध्ये कामे न करता निधी हडप केल्याची शक्यताआहे.

## बुर्ला महिला महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची डॉ. कोटणीस स्मारकास भेट

✔ **सोलापूर** :पद्मशाली शिक्षण संस्था संचलित ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयातील इतिहास विभागातील विद्यार्थिनींनी जागतिक वारसा दिनानिमित्त भैय्या चौकातील डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारकास भेट देऊन डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे चीनमधील वैद्यकीय योगदान जाणून घेतले. या भेटीप्रसंगी इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. एन. शिंदे, प्रा. डॉ. स्वाती घाटुळे, प्रा. विकास शिंगे उपस्थित होते. महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष काशीनाथ गड्डम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिवा संगीता इंदापुरे, खजिनदार नागनाथ गंजी, विश्वस्त मंडळ आणि प्राचार्य डॉ. राजेंद्र शेंडगे यांनी कौतुक केले.

## डॉ. आंबेडकरांचे कार्य प्रेरणादायी : दीपकआबा


✔ सुराज्य/सांगोला

महामानव, घटनेचे शिल्पकार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुजनांच्या उद्धारासाठी व राष्ट्र उभारणीसाठीचे कार्य देशाला प्रेरणादायी आहे, असे मत महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केले. आलेगाव (ता. सांगोला) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मिरवणूक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

आजच्या युवकांनी कोणत्याही क्षेत्रामध्ये यश मिळवण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या उक्तीप्रमाणे शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा अशा पद्धतीचे स्वतःचे वागणे असले पाहिजे व कोणत्याही व्यसनाला आहारी न जाता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून स्वतःचा व राष्ट्राचा उद्धार करण्याची आज गरज भासू लागली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात घेणे सध्या काळाची गरज आहे. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली. आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. या प्रसंगी श्रीरंग बाबर, संग्रामसिंह बाबर, पांडुरंग बाबर, डॉ. अभिजीत बाबर, सुनील बाबर, राहुल ढोले, चंचल बनसोडे, योगेश दिवसे, बाळासो पाटील, किशोर नवघरे,नितीन रसाळ, प्रकाश जाधव, आकाश नवघरे, जयसिंग गडहिरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## बार्शीमध्ये दोन चोऱ्यामध्ये पाच लाखांचे दागिने पळविले

✔ **बार्शी** : बार्शी शहरातील अलिपूर रोड भागातील गव्हाणे वस्ती येथील एकाच्या घराचा कडीकोयंडा तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ४५५०० व अन्य एका महिलेची अर्धा तोळयाची सोन्याची चैन असा सुमारे साठ हजार रूपयांचा ऐवज अज्ञात चोरटयाने चोरून नेला. दि. १६ रोजी रात्री १० ते दि १७ च्या पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास ही घरफोडीची घटना घडली. भगवान मनोहर पिंपळे (रा.गव्हाणे वस्ती, अलिपूर रोड, बार्शी) यांनी याबाबत बार्शी शहर पोलीसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे कुटूंबिय दि. १६ रोजी रात्री १० वाजणेचे सुमारास झोपले होते. दि. १७ रोजी पहाटे २.३० च्या सुमारास त्यांचे शेजारी राहणारे चंद्रकांत राऊत यांनी त्यांना हाक मारून उठविले व तुमच्या घरास बाहेरून कडी कोणी लावली आहे असे विचारले. पिंपळे यांनी त्यांना माहित नसल्याचे सांगून कडी उघडण्यास सांगितले. बाहेर आल्यानंतर घराच्या किचनच्या दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला व दरवाजा उघडा दिसला. त्यांनी आत जावून पाहिले असता किचनमधील स्टीलच्या डब्यातील प्रत्येकी ६ ग्रॅम वजनाचे सोन्याची कर्णफुले व मणी मंगळसूत्र व रोख रक्कम रूपये ९५०० दिसून आले नाही. त्याचप्रमाणे त्यांचे घराचे जवळ राहणारे अक्षिता रोहित सोनवणे यांचे घरातील ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्याचे सांगितले. पिंपळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## सोलापूर बसस्थानकातील अस्वच्छता दूर करण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर

अस्वच्छ प्रसाधनगृह, परिसरात कचऱ्याचे साम्राज्य, भित्तीपत्रकांमुळे विद्रूप झालेल्या भिंती, तुटलेली बाकडी, बंद असलेले पिण्याच्या पाण्याचे नळ, जळमटांनी माखलेले छत, बसस्थानकावर उघड्यावर सोडलेले मुतारींचे सांडपाणी, परिसरातील खड्डे अशी सोलापूर बसस्थानकाच्या दुरावस्थेची छायाचित्रे हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाकडून थेट एस.टी.चे विभागीय वाहतूक अधीक्षक सदाशिव कदम यांच्यापुढे सादर करण्यात आले.

याप्रसंगी जी.एस.टी. सल्लागार गणेश वास्ते, उद्योगपती किशोर पुकाळे, निखिल बोगा, सुराज्य अभियानाचे दत्तात्रय पिसे आदी उपस्थित होते.

७५ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त एस.टी. महामंडळाने वर्ष २०२३ हे अमृत महोत्सवी वर्ष घोषित केले असून त्यानिमित्त बसस्थानक स्वच्छता मोहीम घोषित केली आहे. मोहीम घोषित करून प्रत्यक्षात मात्र बसस्थानके किती अस्वच्छ आहेत, हे लक्षात आणून देण्यासाठी सुराज्य अभियानाकडून हे निवेदनही देण्यात आले.

## बदलत्या जीवनशैलीत वेळ काढून स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे : खरटमल

✔ सुराज्य/सोलापूर

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकाने आपल्या आरोग्यासाठी काळजी घेतली पाहिजे असे प्रतिपादन माजी परिवहन उपायुक्त चंद्रकांत खरटमल यांनी केले.

श्रीनिधी स्वयं सहाय्यता विकास संघ सोलापूर, महादेव मित्र मंडळ शास्त्रीनगर सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शास्त्रीनगर येथील महादेव मंदिर येथे निःशुल्क महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सेवा निवृत्त परिवहन उपायुक्त महाराष्ट्र चंद्रकांत खरटमल यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार श्रीकांत शिंदे यांनी केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात मध्ये प्रा. डॉ. दीपक नारायणकर, श्रीकांत शिंदे, मनोहर नारायणकर, रोहित होटकर, रवींद्र शिंदे, किरण सदाफुले, जीवन इंगळे, शशिकांत सदाफुले, मनोज शिंदे, विद्याधर सोनकवडे,नागेश खरटमल, संतोष कटके, अरविंद शिंदे, आनंद व्हटकर, प्रकाश नारायणकर, विजय कटकधोंड, अनिकेत नारायणकर व प्रशांत नारायणकरयांनी परिश्रम घेतले.

## कासार समाजातील इच्छुक वधूवर ३० एप्रिलला सोलापुरात एकवटणार

✔ सुराज्य/सोलापूर

मुलामुलींची लग्न जमवणं म्हणजे एक सामाजिक समस्या आहे. ती समस्या दूर करण्यासाठी ३० एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत सम्राट चौकातील हिराचंद नेमचंद धर्मशाळेत जैन कासार विकास प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय वधू-वर आणि पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे अध्यक्ष हुकूमचंद हेसे आणि दिगंबर जैन कासार संस्थेचे अध्यक्ष पोपटलाल डोर्ले यांनी सांगितले.

२२ एप्रिलपर्यंत वधू-वरांनी आपली नावे झुंजे बोळ येथील दिगंबर जैन कासार मंदिरातील कार्यालयात नावे नोंदवावीत. तत्पूर्वी शनिवार दि. २९ एप्रिल रोजी दिगंबर जैन कासार समाज संस्थेने राज्यस्तरीय महिला स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात समाजातील कर्तृत्वावान महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. समाजबांधवांनी या दोन्ही मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, उपाध्यक्षा माणिक व्यवहारे, संजय कंदले, डॉ. विलास हरपाळे, कांतीलाल नळे, शशिकांत मोहरे आदींनी केले आहे. दोन्ही मेळावे यशस्वी करण्यासाठी अभिनंदन अगरथडे, प्रथमेश कासार, बाबुराव तंगा, महेश नळे, सचिन पाटील, प्रा.धन्यकुमार बिराजदार, विक्रांत बशेट्टी, संजय गडदे, महावीर लाळे, राजू सासवडे, प्रा.संतोष यादगिरे आदी प्रयत्नशील आहेत.

### प्री-वेडिंग न करण्याबाबत शपथ देणार

या मेळाव्यात उपस्थित उपवर वधू-वर व पालकांना प्री-वेडिंग न करण्याबाबत शपथ देण्यात येणार आहे. प्री-वेडिंगमुळे एकतर खर्चात लाखो रुपये खर्च होतात व यामुळे अनेक विवाह मोडल्याच्याही घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे उपस्थितांना याबाबत शपथ देण्यात येणार आहे. भोजन पदार्थातही संख्या मर्यादित ठेवण्याबाबत समाज बांधवांना आवाहन करण्यात येणार आहे.

## ग्रीन एनर्जी कॉरिडॉरच्या योगदानाबद्दल महापारेषणला पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर

ईक्यू इंटरनॅशनल यांच्या वतीने पुणे येथे आयोजिलेल्या सूर्याकॉन परिषदेत महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनीला (महापारेषण) ग्रीन एनर्जी कॉरिडॉर प्रकल्पात उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.




महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) केंद्र शासनाच्या ग्रीन एनर्जी कॉरिडॉर योजनेत सहभागी होऊन एकूण १६ अति उच्च दाब वाहिन्या (५९० सर्किट किलोमीटर) व ३६ संलग्न बे ची स्थापना करून एकूण ९३८ मेगावॅट एवढी अपारंपारिक ऊर्जा निष्कासित करण्यासाठी पारेषण मजबुतीकरणाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टानुसार महापारेषण कंपनी सुमारे ३४०० कोटी रूपयांचे अपारंपारिक ऊर्जा निष्कासनाचे प्रकल्प प्रस्तावित करण्याच्या तयारीत आहे. हे प्रकल्प ग्रीन एनर्जी कॉरिडॉर टप्पा-३ अंतर्गत पूर्ण करण्याचे महापारेषणचे उद्दिष्ट आहे.

# डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या अधिकार हक्कामुळे राष्ट्रपती पदावर स्त्रिया विराजमान : ठोंबरे

✔ सुराज्य/मोहोळ

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना दिलेले अधिकार हक्क यामुळे देशाच्या सर्वोच्च असणाऱ्या राष्ट्रपती पदावर स्त्रिया विराजमान होत आहेत नदया जोड प्रकल्प ही संकल्पना १९४२ ला मांडली रिझर्व बॅंकेची स्थापना त्यांच्याच शिफारशीनुसार करण्यात आली असल्याचे प्रतिपादन सोलापूरचे अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी व्यक्त केले.**



येथील पंचशील मंडळाच्या वतीने वतीने क्रांती सुर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षिस वितरण समारंभ व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला त्यावेळी प्रमुख आतिथी म्हणून ते बोलत होते. मोहोळ नागरी पत संस्थेचे चेअरमन डॉ. कौशीक गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी बहुजन शिक्षक महासंघाचे प्रदेश अध्यक्ष आण्णासाहेब भालशंकर याना मानाचा व प्रतिष्ठेचा पंचशील रत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गट विकास आधिकारी आनंदकुमार मिरगणे, माजी जि प सदस्या सीमाताई पाटील, माजी उप नगराध्यक्ष प्रमोद डोके, माजी नगर सेवक सुशील क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक संतोष इंगळे, महासंघाचे राज्य सचिव प्राचार्य बोधीप्रकाश गायकवड सामाजिक कार्यकर्त्या यशोदा कांबळे, आध्यक्ष शशीकांत ठोकळे, संस्थापक प्रा. अशोक पाचकुडवे, मानव आधिकार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष कुमार ढवळे आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ठोंबरे म्हणाले की जस जसा काळ पुढे जाईल तसे महापुरुषांनी त्या वेळेस मांडलेले विचार मागे पडत असतात परतु बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वरचेवर रिलेव्हंट होत चाललेले आहेत त्या त्या समाज घटकांना ते आवश्यक वाटत आहेत. शेतकऱ्यांसाठी धरणे बांधली हक्काच पाणी आणि हमी भाव शेतकऱ्यांना मिळाला पाहीजे हा विचार बाबासाहेबांनी त्यावेळी मांडला हे दृष्या विचारवंताचे काम आहे असे ते म्हणाले.

यावेळी आण्णासाहेब भालशंकर बोलताना म्हणाले भारतीय संविधान जगातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे राज्यकर्त्याकडून त्याची काटेकोर पणे आमलबजावणी होणे गरजेचे आहे. आपल्याला नुसते शिक्षित होउन चालणार नाही तर सुसंस्कृत झाले पाहिजे. शिका संघटीत व्हा. व संघर्ष करा हा बाबासाहेबांचा संदेश आचरणात आणला पाहिजे. यश मिळवलेल्या स्पर्धकाना मंडळाच्या वतीने आकर्षक बक्षिसे देण्यात आली. प्रास्ताविक हाणमंत भडकवाड यांनी केले सूत्रसंचालन प्रा. प्रकाश शिंदे यांनी केले तर प्रा. अशोक पाचकुडवे यांनी उपस्थितीतांचे आभार मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष आक्षय आठवले, संदीप सोनवणे, आदर्श ढवळे, डॉ. तेजस्विनी ठोकळे पाचकुडवे, विशाल रोडे, पंकज भडकवाड, आदित्य आठवले, दिपक माडिखांबे, सचिन सोनवणे, सिद्धार्थ निकंबे, मानव चवरे आदिनी परीश्रम घेतले.

# ‘चला जाणूया नदीला’ अभियानांतर्गत कासाळगंगा कृती दलाची स्थापना : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

प्राचीन संस्कृती नदीकाठी वसलेली होती. नदी प्रदूषण रोखणे सर्वांची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर चला जाणूया नदीला अभियान अंतर्गत कासाळगंगा नदी प्रदूषणमुक्त करत बारमाही वाहण्यासाठींच्या क्षेत्रीय उपचारासाठी कृती दलाची स्थापना करण्यात येत असून, यासाठी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी नियुक्ती करण्यात येत आहे. येत्या १ मे पासून प्रत्यक्ष कामास सुरूवात करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिली.

चला जाणूया नदीला अभियान अंतर्गत आयोजित बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या बैठकीस अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, जि. प. कार्यकारी अभियंता पंडित भोसले, जलसंपदा विभागाच्या उपकार्यकारी अभियंता संध्या अलझेंडे, प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. मुश्ताक शेख, राज्य समन्वयक डॉ. सुमंत पांडे, नदी समन्वयक महेंद्र महाजन आणि बाळासाहेब ढाळे, सहाय्यक गटविकास अधिकारी डी. एम. पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, प्रकल्प कार्यक्षेत्रातील सर्व गावचे सरपंच, ग्रामसेवक, उमेदचे अधिकारी उपस्थित होते.

चंद्रभागा नदी आपला प्राण आहे. चंद्रभागा परिक्रमा करून जनजागृती करण्यात आली आहे. माझी वसुंधरा अंतर्गत

## अध्यक्षपदी अतिरिक्त सीईओ कोहिनकर



एक बैठक वसुंधरेसाठी घेण्यात आली आहे, असे सांगून मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात नदीकाठच्या गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत या ग्रामपंचायतींना ७० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नद्यांमध्ये सांडपाणी सोडू नये. घनकचरामध्ये जनावरांचे मलमूत्र जाऊ नये. गावात प्लास्टीक व्यवस्थापन व्हावे, हा या पाठीमागचा उद्देश आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे म्हणाले, नदीकाठच्या गावांचा कृती दल तयार करण्यात येत आहे. या माध्यमातून कामांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. पंधरावा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन ग्रामीणचे संयोगिकरण करण्यात येत आहे. या गावात सर्व कुटुंबाला शौचालये, सार्वजनिक शौचालय व सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे आराखडे करण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

कासाळगंगा प्रकल्पांतर्गत कासाळगंगा नदीचे पुनरूज्जीवन करण्यात आले आहे. कासाळगंगाच्या धर्तीवर जिल्ह्यातील नद्या वाहत्या करण्यासाठी माण नदीचे पुनरूज्जीवन करण्यात येत असल्याचे सांगून जलयुक्त शिवार टप्पा २, सामाजिक वनीकरण, जलसंपदा, जलसंधारण विभाग, ग्रामविकास व कृषी विभाग, भूजल सर्वेक्षण विभाग या विभागांचा अंतर्गत कृतीसंगम करून मध्यम मुदतीचे व दीर्घ मुदतीच्या कामांचे नियोजन करावे, असे डॉ. सुमंत पांडे यांनी यावेळी सांगितले. कासाळगंगा प्रकल्पअंतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती महेंद्र महाजन यांनी यावेळी दिली.

या बैठकीत चला जाणूया नदीला उपक्रमांतर्गत पूर आणि दुष्काळाच्या वैश्विक समस्येवर उपाय व ग्रामविकासाला चालना हा कासाळगंगा नदी समन्वयकांनी दिलेला अहवाल जिल्हाधिकारी महोदयांच्या स्वीकृतीसाठी सादर करण्यात आला. नदी प्रदूषण रोखून ती अमृतवाहिनी होण्यासाठी करावयाची विभागनिहाय कार्यवाही या अहवालात समाविष्ट करण्यात आली आहे.



## शिवाजी रात्र महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

✔ **सोलापूर** : छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. मनोहरपंत सपाटे साहेब हे होते. प्रमुख पाहुणे संस्थेचे जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने सर व सदस्य महादेव गवळी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल बारबोले सर व माजी विद्यार्थी मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. अरुण सोनकांबळे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मनोगत व्यक्त करताना मनोहर सपाटे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय मनाशी बाळगले पाहिजे. आपण समाजाचे काही देणे आहोत म्हणून समाजासाठी काहीतरी केले पाहिजे. अशी तळमळ विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थ्यांनी नेहमी गतिशील राहावे मोठी स्वप्ने पहावीत तरच जीवनात गतिशीलता कायम राहते असे ते म्हणाले. प्रा. महेश माने सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल बारबोले सरांनी आपल्या खास शैलीमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांमध्ये मंगल चव्हाण, मुकुंद गिरी, सुषमा भुसारे, चंद्रकांत इंजामूरी, साहेबराव परबत, विठ्ठल वाघचौरे, अक्षय भोसले, विजय निरस्ताने, चंद्रकांत बिजरगी, संजय कुनी या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या मेळाव्यास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. युवराज सुरवसे यांनी केले तर आभार प्रा.देवेंद्र आदमाने यांनी मानले.




## ‘रमजान की रहेमतें’ या गीतामधून एकात्मतेचा संदेश : पोलीस आयुक्त

✔ **सोलापूर** : सोलापूर सुरमणी मोहम्मद अयाज यांच्या आवाजात रमजान कि रहेमतें हा इस्लामिक डिव्होशनल अल्बम पोलीस आयुक्त राजेंद्र माने व पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. हा अल्बम झी म्युझिक मधुन प्रकाशित करण्यात आला..माहें रमजान आया हरसू करम का साया, कीस्मत जगी मोमींनों की बख्शीश का पयाम लाया माहे रमजान आया. या गीताचे गायक, गीतकार, संगीतकार मोहंम्मद अयाज असुन संगीत संयोजन साहीर नदाफ यांनी केले व प्रोग्रामींग सचिन शैलेश यांनी केला आहे. याचे ध्वनीमुद्रण प्रकाश माने केले आहे. रमजान हा महिना समस्त मानवजातीसाठी असुन या पवित्र महिन्यात सामाजिक बांधिलकी, त्याग, बलीदान, एक दुसर्याच्या अडी अडचणी जकात देऊन मदत करणे. ईश्वरीय शक्तींची जाणींव रोजा व नमाज पठणातुन होते.रमजानचे महत्व या गीताच्या माध्यमातून मोहम्मद अयाज सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. अयाज आज पर्यंत अशा अनेक गाणी वेगवेगळ्या गायकां सोबत गायलेले आहेत. या मध्ये आशा भोसले, उषा मंगेशकर, अनुराधा पौडवाल, सुरेश वाडकर, अनुप जलोटा, हेमलता, साधना सरगम, वर्षा उसगावकर, सपना अवस्थी अशा अनेक दिग्गज गायक कलावंता सह गाऊन सोलापूरचा नाव लौकीक केलेला आहे. तसेच संगीत क्षेत्रात जागतिक नामांकन व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड ने मोहम्मद अयाज यांना सन्मानित केले.

## मोडनिंबच्या महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालयात गतका स्पर्धा

✔ **मोडनिंब** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर क्रीडा परिषद अंतर्गत आंतर महाविद्यालयीन गतका क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विद्यापीठातील बारा महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला. या स्पर्धेचे चेअरमन म्हणून महाराष्ट्र गतका फेडरेशनचे अध्यक्ष पांडुरंग अंभोरे आणि सोलापूर शहर गतका फेडरेशनचे अध्यक्ष आप्पा चिंचोलकर व महाराष्ट्र गतका फेडरेशनचे सदस्य शुभम पुरवत, सोलापूर जिल्हा गतका फेडरेशनचे अध्यक्ष प्रा. धनंजय देशमुख, संघ व्यवस्थापक प्रा. गवळी सोलापूर, प्रा. देशपांडे मोहोळ, प्रा. डॉ. दळवी सोलापूर, प्रा. डॉ. बापू मोहीते अनगर, प्रा. तांबीले कुर्डुवाडी उपस्थित होते. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील क्रीडा समिती सदस्य प्रा. डॉ. सुभाष गायकवाड, प्रा. पाटील एच.पी., प्रा. सुहास पाटील, प्रा. स्वाती बेलपत्रे, बंडु आदलिंगे यांचे सहकार्य लाभले. या स्पर्धेचे उद्‌घाटन प्राध्यापक जयंत समुद्र यांच्या हस्ते झाले यावेळी अध्यक्ष स्थानी मोडनिंबचे माजी सरपंच माननीय बाबू तात्या सुर्वे होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष पी.के. पाटील, विश्वस्त निवृत्ती सुर्वे, उमा विद्यालयाचे प्राचार्य ए.पी. पाटील, क्रीडा शिक्षक संतोष पाटील, मोडनिंब विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे नूतन चेअरमन औदुंबर सुर्वे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पाटील एस. टी. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सुभाष गायकवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.भांगे पी. बी. यांनी केले.

## संगीतकारांसोबत मनोरंजनाचा आनंद

✔ **सोलापूर** : लिव्हिंग इट लार्जच्या उत्साहाला साजरे करत रॉयल स्टॅग अनोखा संगीत अनुभव रॉयल स्टॅग बूमबॉक्स सादर करत आहे.या संगीत महोत्सवाने १५ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे चौथ्या शोचे आयोजन केले. जेथे रॉयल स्टॅग बूमबॉक्सने मूळ संगीताचा अनुभव देण्यासाठी, तसेच नवीन संगीताचा आविष्कार करण्यासाठी संगीतक्षेत्राच्या दोन विरूद्ध बाजू बॉलिवुडच्या मेलोडी आणि हिप-हॉपच्या उत्साहाला एकत्र आणले. जवळपास १०,००० प्रेक्षकांची उपस्थिती पाहायला मिळाली.

## जयश्री वाघमोडे यांचे निधन



✔ **अक्कलकोट** : तालुक्यातील हंजगी येथील कै जयश्री विद्याधर वाघमोडे (वय वर्षे ५३) यांचे आज सकाळी ११ वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,चार मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर हंजगी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कृषी सेवक प्रतिक वाघमोडे यांच्या त्या मातोश्री होत.

## ‘सिध्देश्वर’च्या हंगामातील शेवटच्या साखर पोत्याचे पूजन

✔ सुराज्य/सोलापूर



येथील श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्यात २०२२-२३ या गळीत हंगामात उत्पादित झालेल्या शेवटच्या साखर पोत्यांचे पूजन कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले.

यावेळी काडादी म्हणाले, २०२२-२३ या गळीत हंगामात १० लाख १ हजार १६० मेट्रिक टन उसाचे गाळप होऊन ९ लाख ६२ हजार १५ क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. सरासरी साखर उतारा अंदाजे ११.०१ टक्के इतका मिळाला आहे. सदर हंगामात कारखान्याने सहवीज निर्मिती प्रकल्पातून ११ कोटी ६९ लाख ६ हजार ७९५ युनिट विजेचे उत्पादन केले असून त्यामधून ८ कोटी २४ लाख २४ हजार ६०० युनिट वीज निर्यात केली आहे. चालू हंगामामध्ये उसाच्या एकरी उत्पादनात घट झाल्याने महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना सुमारे ३० ते ३५ टक्क्यांनी कमी गाळप करावे लागले. आपल्या कारखान्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन केले नसून प्रदूषण पातळी शून्य राखण्याकरिता बायोगॅस, कंपोस्टिंग व २००० मीटर क्युब क्षमतेच्या अद्ययावत इफ्ल्युएंट ट्रिटमेंट प्लँट (इटीपी) असे विविध प्रकल्प कार्यान्वित आहेत. बॉयलरकरिता इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपिटेटर (इएसपी) बसविण्यात आले आहे. त्यामुळे हवा व पाण्याचे प्रदूषण होणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली आहे. पुढील हंगामात इथेनॉल व सीएनजी प्रकल्प सुरू करण्याचे नियोजन असल्याचे सांगून सन २०२३-२४च्या गळीत हंगामात कारखाना ऑक्टोबर २०२३ पासून पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी सर्व कामे या बंद वेळेत पूर्ण करून घ्यावीत, असे काडादी म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारखान्याचे सचिव सिध्देश्वर शीलवंत यांनी केले तर युनियनचे जनरल सेक्रेटरी अशोक बिराजदार यांनी आभार मानले.



## पिलीव येथे युवासेनाचा रोजगार मेळावा

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना व युवासेनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला रोजगार मेळावा संपन्न झाला.

शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख अनिलजी कोकीळ व युवासेना राज्य विस्तारक उत्तमजी आयवळे, यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना सोलापूर जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे, युवा सेना सोलापूर जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना माळशिरस तालुका प्रमुख सुभाष काकडे व युवा सेना माळशिरस तालुका उपाध्यक्ष डॉ निलेश कांबळे यांच्या संकल्पनेतून कर्मवीर भाऊराव पाटील येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कंपनीचे प्रतिनिधी नागेश कांबळे, ओमनी अकटीव कंपनीचे सारंग महामुनी, मेरीलीन मा्दरसन कंपनीचे सागर, बि.व्हि.जी. कंपनीचे भारत निघोजकर यांनी उपस्थित पात्र उमेदवाराच्या निवडी केल्या. यावेळी शिवसेनेचे माळशिरस तालुका अध्यक्ष संतोष राऊत, शिवसेना तालुका उपाध्यक्ष महादेव बंडगर, युवा सेना तालुका उपाध्यक्ष दुर्वा आडके, पव ईचे शाखा प्रमुख सचिन मदने, शयामतात्या मदने, माजी सरपंच अमोल मदने, अविनाश जेऊरकर, देवा लोखंडे, अजित शिंदे, तानाजी शिंदे, योगेश देशमुख, समर्थ जामदार, अमोल लोखंडे, विशाल पिसे, विशाल शेडंगे, सुरज साठे, महेश देशमुख, राहुल सुर्यवंशी, भैया सावळजकर, अथर्व काकडे, विनोद लोखंडे, दामोदर लोखंडे, संजय पाटील उपस्थित होते.

## पांडुरंग कारखाना साखर उताऱ्यात जिल्ह्यात अव्वल

✔ सुराज्य/श्रीपूर

श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे नुकतेच नाम विस्तारीकरण झाले असून आता कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना या नावाने चालणार असून गत हंगाम २०२२-२३ मध्येही कारखान्याने जिल्ह्यात सरासरी साखर उतारामध्ये धबधबा ठेवला असून हंगाम अखेर ११.५०% सरासरी साखर उतारा मिळवून जिल्ह्यात अव्वल क्रमांकावर राहिला आहे.

जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्या चा सरासरी साखर उतारा पाहता तो कमी असल्याचे दिसून येत आहे.कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने यंदाच्या हंगामात ९ लाख ६१ हजार मे.टन उसाचे गाळप करून जिल्ह्यात सर्वाधिक ११.५० टक्के साखर मिळवत ९ लाख ५५ हजार ५९० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन काढले आहे. त्यामुळे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कारखाना दरात ही जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर राहणार आहे .तसेच माढा तालुक्यातील पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाने जिल्ह्यात सर्वाधिक १८ लाख ४१ हजार मे.टन गाळप केले आहे. गतवर्षी पाऊसमान कमी झाल्याने १० ते १५ मे टन उसाचे उत्पादन प्रति एकरी कमी निघाले आहे त्यामुळे जिल्ह्यातील सर्वच



सहकारी व खाजगी साखर कारखान्याचे गाळप अपेक्षापेक्षा कमी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत या हंगामात सर्वच कारखान्यांचा गाळप हंगाम एक महिना अगोदरच आटोपला आहे.

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने मागील दहा वर्षापासून ऊस दरात व साखर उताऱ्यामध्ये जिल्ह्यात धबधबा कायम ठेवला असून व उत्पादक शेतकऱ्यांनाही साखर उताऱ्याप्रमाणे सर्व ऊस बिलाची रक्कम वेळेवर दिली आहे. पुढील गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये हा कारखाना प्रतिदिन ९ हजार मे.टन गाळप क्षमतेने चालणार असून त्या दृष्टीने कारखान्यामधील आवश्यक त्या सर्व सुधारणा करण्यात येत आहेत. या हंगामात कारखान्याने १४१ दिवस कारखाना चालवून ९ लाख ६१ हजार मे.टन उसाचे गाळप करून ९ लाख ५५ हजार क्विंटल साखर पोती उत्पादित केली आहेत. दिवसेंदिवस कार्यक्षेत्रातील उसाचे क्षेत्र आहे तेच असून प्रत्येक कारखान्याने स्वत:ची गाळपक्षमता वाढवल्यामुळे प्रत्येक वर्षाचा गाळप हंगाम हा सुमारे १५ ते २० दिवस अगोदरच संपत आहे. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे ऊस गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कारखाना व्यवस्थापनाने आवश्यक ते बदल करण्यास सुरुवात केली आहे.

## स्वामी समर्थ महाराज व गोरोबाकाकांची पुण्यतिथी भक्तिभावाने साजरी

✔ सुराज्य/अकलूज

शंकरनगर अकलूज येथे अकलूज कुंभार समाज व भाविकांच्या वतीने श्री अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज यांची १४५ वी पुण्यतिथी व संत शिरोमणी गोरोबाकाका कुंभार यांची सातशे सहावी पुण्यतिथी भक्ती भावाने साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने राहुल कुंभार व सौभाग्यवती महेश्वरी कुंभार यांच्या हस्ते स्वामी समर्थ महाराज व गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन करून दुग्धाभिषेक करण्यात आला तर नंतर पुष्प वृष्टी करून महाआरती करण्यात आली. भोजन प्रसादाचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास कुंभार समाजाचे अध्यक्ष अमित कुंभार तसेच रामभाऊ कुंभार सुभाष कुंभार दिलीप कुंभार संदीप कुंभार रमण कुंभार



याचबरोबर अशिष खराडे मामा तुकाराम भोईकर विठ्ठलराव घोरपडे यांनी उपस्थिती लावली तर सुनील महाडिक, उमेश लोखंडे, अनिल कुंभार, गणेश कुंभार, रामा कुंभार, यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## पुण्यतिथीनिमित्त हजारो भाविक स्वामींचरणी नतमस्तक

✔ सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थांचे मूळ स्थान असलेल्या येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात श्री स्वामी समर्थांच्या १४५ व्या पुण्यतिथी निमित्त हजारो भाविक आज दिवसभरात स्वामींच्या चरणी नतमस्तक झाले. स्वामी समर्थांचा पुण्यतिथी सोहळा म्हणजे अक्कलकोटकरांचे अंतकरण भरून येते.

या पार्श्वभूमीवर श्री स्वामी समर्थांचा १४५ वा पुण्यतिथी सोहळा संपन्न झाला. ’अनंतकोटी ब्रम्हांड नायक अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय’ या अबाल वृद्धांच्या जयघोषाने अवघा आसमंत दुमदुमला. पहाटे २ पासूनच श्रींच्या दर्शनाकरिता स्थानिक व परगावाहून आलेल्या भाविकांची गर्दी होती. सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने मंदीर परिसरात बॅरेकेटींगची सोय करण्यात आली होती. भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये याकरिता राजे फत्तेसिंह चौकापर्यंत रस्त्याच्या कडेला एकेरी लाईनचे कापडी मंडप उभारून विशेष सोय करण्यात आली होती. मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत चोळप्पा महाराजांचे वंशज पुरोहित मंदार पुजारींच्या हस्ते पहाटे २ वाजता पारंपरिक पद्धतीने श्रींची काकडआरती संपन्न झाली. नगरप्रदक्षिणा वटवृक्ष मंदिर ते समाधी मठ ते पुन्हा मुख्य वटवृक्ष मंदिराकडे पहाटे ३ ते ४ या वेळेत पार पडला. देवस्थानचे व राजघराण्याच्या वतीने महेश इंगळे व गणेश दिवाणजी यांच्या उपस्थितीत पारंपरिक लघुरुद्र पहाटे ४ ते ५ या वेळेत पुरोहित मोहन पुजारी व मंदार महाराज पुजारी यांच्या मंत्रोचारात पार पडले. गेल्या ७ दिवसांपासून सुरु असलेला अखंड नामवीणा सप्ताह समाप्ती सोहळा ज्योतीबा मंडपात सकाळी ७ वाजता देवस्थानचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे यांचे हस्ते व सत्संग महिला भजनी मंडळाच्या भजनाने करण्यात आली.



सकाळी ११ वाजता देवस्थानची नैवेद्य आरती दुपारी १२ वाजता अक्कलकोट राजघराण्याच्या वतीने श्रीमंत मालोजीराजे भोसले राजेसाहेबांच्या हस्ते व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्तिथीत श्रींना महानैवेद्य दाखविण्यात आले. यावेळी विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, शांभवी कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी, प्रथमेश म्हेत्रे, शिवराज म्हेत्रे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उद्योगपती प्रवीण देशमुख, मुंबईचे उद्योगपती स्वानंद खेर, जालनाचे प्रसिद्ध व्यापारी श्वेतांबर महाडिक, इंदौरचे व्यापारी जगपाल सिसोदिया आदींसह हजारो स्वामी भक्तांनी स्वामी दर्शनाचा लाभ घेऊन श्रींच्या चरणी नतमस्तक झाले.

भजन सेवा सोहळयात सोलापूर, पंढरपूर, वैराग, मंगळवेढा, लातूर, बार्शी, सांगोला, इत्यादी भागातून ४२ भजनी मंडळांनी आपली भजनसेवा अखंडपणे श्रींच्या चरणी समर्पित केली. यावेळी सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, दयानंद हिरेमठ, ॲड. प्रदीप झपके, विजय दास, गणेश दिवाणजी, शशिकांत लिम्बीतोटे, शिवशरण अचलेर, प्रशांत गुरव, गिरीश ग्रामोपाध्ये, श्रीनिवास इंगळे, प्रथमेश इंगळे, मंगेश फुटाणे, चंद्रकांत डांगे, नंदू जगदाळे, श्रीशैल गवंडी, संजय पाठक, मनोहर देगावकर, स्वामीनाथ लोणारी, शंकरराव पवार, मल्लिनाथ बोधले, गिरीश पवार, संजय पवार, ऋषिकेश लोणारी, बाळासाहेब घाटगे, सागर गोंडाळ, दीपक जरीपटके, गिरीश ग्रामोपाध्ये, अविनाश क्षीरसागर, प्रसाद सोनार, ज्ञानेश्वर भोसले, मंगेश फुटाणे, प्रसाद किलजे, संजय बडवे, नरसिंग क्षीरसागर, मोहन शिंदे, मोहन जाधव, नीलकंठ हिंडोळे, विलास कोरे, अतुल कोकाटे, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, अशोक जाधव, सतीश पवार, प्रदीप हिंडोळे, सुभाष पेठकर, स्वामीनाथ फुलारी उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळात हजारो स्वामी भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

सुराज्य/अक्कलकोट

**दिगंबरा दिगंबरा.... श्रीपाद वल्लभ दिगंबरा....! श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय...च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात १४५ व्या श्रींच्या पुण्यतिथी निमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी पहाटे रथोत्सव, विधीवत पूजा, धार्मिक कार्यक्रम, पारायण, महाप्रसाद, रक्तदान, व जिम्नॅशियमचा १५ वा वर्धापन दिन मान्यवरांच्या भेटी व सत्कार आदी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.**



अन्नछत्र मंडळात हजारो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले. न्यासाने केलेल्या नेटक्या नियोजनाने भक्तातून समाधान व्यक्त करण्यात आले असून, अन्नछत्र मंडळात भक्तीचा मळा फुलला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गेल्या ३५ वर्षापासून श्रींची पुण्यतिथी साजरी केली जाते. या बरोबरच नगर प्रदक्षिणेच्या शेवटच्या सात दिवस रथ सप्ताह असतो, यामध्ये न्यासाच्या रथाचा सहभाग असतो. दरम्यान मंगळवारी पहाटे श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील पूजनानंतर अमोलराजे भोसले यांच्या हस्ते रथाचे पूजन करुन बुधवार पेठेतील समाधी मठाकडे मार्गस्थ करण्यात आले.

महाप्रसादालयात सकाळी स्वामींचे पारायण संपन्न झाले. दुपारी ११.३० च्या दरम्यान श्री व अन्नपूर्णा, महाप्रसादाचे पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृह राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे व मराठी अभिनेता विलास चव्हाण पुणे, डॉ.प्रसाद प्रधान ठाणे, मनसेचे राज्य उपाध्यक्ष विनायक (बंटी) म्हशीलकर यांच्यासह स्वामी भक्तांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अन्नछत्र मंडळातील नैवेद्य श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर, बुधवार पेठेतील समाधी मठात श्रींना दाखविण्यात आले. यावेळी स्वामीभक्त उपस्थित होते.

यानंतर महाप्रसादालयात न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या मंत्र पठणाने महाआरती संपन्न झाली व आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी राज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या हस्ते संकल्प सोडण्यात आल्यानंतर भक्तांना महाप्रसाद देण्यात आला. यावेळी १७५ स्वामीभक्तांनी रक्तदान केले. श्री स्वामी समर्थांच्या कृपा आशिर्वादाने न्यासाचे विविध विकास कामांच्या बाबतीत आघाडी घेतलेली आहे. या बरोबरच न्यासाने स्वामीभक्त व शहरवासियांच्या सोयीकरिता इन व आऊट डोअर व्यायाम शाळा उपलब्ध करुन दिलेली आहे. आजवर यास उत्स्फूर्त प्रसाद मिळाला आहे. यापैकी इनडोअर असलेल्या मातोश्री श्रीमंत कांतामती विजयसिंहराजे भोसले जिम्नॅशियम सेंटरच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री हनुमान मूर्तीचे पूजन अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. १४५ व्या श्री स्वामी समर्थांच्या पुण्यतिथींचे औचित्य साधुन अनेक मान्यवरांनी अन्नछत्राला भेट दिली. अन्नछत्र मंडळात हजारो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, संदीप (दाजी) फुगे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, रार्जेद्र लिंबीतोटे, लक्ष्मण पाटील, किशोर सिद्धे, अप्पा हंचाटे, मनोज निकम, प्रविण देशमुख, माजी नगरसेवक रामचंद्र समाणे, वैभव नवले, वैभव मोरे, सौरभ मोरे, प्रथमेश पवार, अभियंता किरण पाटील, अमित थोरात, रामचंद्र घाटगे, अशोकराव (मामा) जाधव, पिंटू साठे, प्रवीण घाडगे, विजय माने, निखील पाटील, राहुल इंडे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, एस.के. स्वामी, बाळासाहेब पोळ, सतिश महिंद्रकर, गोरखनाथ माळी, नामा भोसले, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, समर्थ घाडगे, देवा हंजगे, संभाजीराव पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, राजू पवार, गोविंदराव शिंदे, गणेश लांडगे, नितीन उण्णद, नागेश कलशेट्टी, शितल जाधव, स्वामिनाथ बाबर, लाला निंबाळकर, सिध्दाराम कल्याणी, संजय गोंडाळ, राहुल शिर्के, दत्ता म्हेत्रे, मैनुद्दीन कोरबू, काशिनाथ वाले, विश्वनाथ हडलगी, रोहित खोबरे, शिवू काळे, सिद्धेश्वर हत्तुरे, राजू म्हेत्रे, रोहित मोरे, चंद्रकांत कुंभारसह सेवेकरी, कर्मचारी उपस्थित होते.

**देश-विदेशातील स्वामी भक्तांची हजेरी**

महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, आंद्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश, केरळ, गुजरात, उत्तराखंड, दिल्ली व जम्मू काश्मीर पंडीत, राजस्थान, उत्तरप्रदेश वाराणसी यासह देश व विदेशातील स्वामी भक्तांनी तीर्थक्षेत्री श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात येऊन हजारो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतले.

**न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ट नियोजन**

देव दर्शनासाठी देशातील विविध राज्यात जाण्याचा योग आला. श्रींच्या पुण्यतिथी दिनाच्या दिवशी श्रीक्षेत्र अक्कलकोटला आलो असता, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात लाखो स्वामी भक्त महाप्रसादाकरिता आलेले होते. त्याठिकाणी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन पाहून माझ्यासह स्वामी भक्तांनी समाधान व्यक्त केले.

**- तुषार पैठणे, स्वामी भक्त मुंबई**



## टेंभुर्णी येथे इफ्तार-ए-दावत पार्टी

**टेंभुर्णी** : जिजाऊ ब्रिगेड व यशस्विनी महिला मंच टेंभुर्णी यांचे वतीने सुरु असलेल्या रमजानसणा निमित्त सर्व मुस्लीम महिलांसाठी 'इफ्तार पार्टीचे' आयोजन करण्यात आले होते. मोठ्या उत्साहात बहुसंख्येने या इफ्तार पार्टीस मुस्लिम महिला उपस्थित होत्या. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या सुरजाताई बोबडे, स्वरालीताई बोबडे, रत्नमाला शिंदे, विद्या देशमुख, आशा निमसे, उर्मिला बारबोले, धनश्री ढवळे, अनिता लोंढे, शिभा जागीरदार, समीना मोमीन, शीला सटाले, अर्चना कुटे, पल्लवी गायकवाड, वंदना चौधरी, अनुराधा पांढरे, उज्वला देशमुख, अश्विनी देशमुख, रेखा पाटील, प्रियंका क्षीरसागर, सुनीता घाडगे इ. यशस्विनी महिला मंचच्या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या तसेच दोन दिवस दावत पार्टीसाठी प्रामुख्याने शमीना मोमीन व शाईन आतार या भगिनींचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी बोलताना सुरजा बोबडे म्हणाल्या, की हा रमजानचा महिना तमाम मुस्लिम बांधवांसाठी पवित्र मानला जातो. अनेकजण यामध्ये रोजे ठेवतात. अन्न व पाण्याचे महत्व जाणवून देणारा व मानवांनी एकमेकांशी बंधुत्वाने वागण्याचा सल्ला मो. पैगंबरांनी दिला आहे. स्व. कृष्णात दादा बोबडे यांनी घालून दिलेला सर्वधर्मसमभाव व सामाजिक एकतेचा संदेश अबाधित राखत सालाबादप्रमाणे यावर्षीही सलग दोन दिवस मुस्लीम महिला भगिणींसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करुन आपल्या उत्सवात सहभागी आहोत हा संदेश दिला. इफ्तार पार्टीला महिलांचा प्रचंड उत्साह मिळाला.येत्या काळात सामाजिक ऐक्य व सलोखा कायम ठेवण्याचा व सर्व धर्मांचा आदर करुन विवधतेत एकता आदर्शवत ठेवण्याचा संकल्प यानिमित्ताने केला गेल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिजाऊ ब्रिगेड, यशस्विनी महिला मंच टेंभुर्णी येथील सर्व पदाधिकारी व समस्त मुस्लीम महिला भगिणी यांच्या उपस्थितीत हा इफ्तार पार्टीचा सोहळा संपन्न झाला.

## गाढवाच्या शिंगरूवर उपचार करून डॉ.सुर्वे यांनी जपला सेवाधर्म

**सांगोला** : दहा ते बारा दिवस वयाच्या गाढवाच्या शिंगरूवर जागेवर जाऊन उपचार करून पशु वैद्यकिय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांनी आपला सेवाधर्म जपण्याचे कार्य केल्यामुळे पक्षीप्रेमी ग्रुपच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. पुजारवाडी, सांगोला येथे सक्सेस क्लासेसचे चालक श्री. महामुनी सर यांच्या घराशेजारी गाढवाचे एक शिंगरू जखमी अवस्थेत त्यांना दिसून आले. महामुनी सरांनी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांच्याशी संपर्क साधून या जखमी शिंगरूवर उपचार करणे गरजेचे असल्याचे सांगितले. यादव यांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत सुर्वे यांना दुरध्वनीवरून संपर्क करून ही माहिती दिली. त्यानंतर तात्काळ डॉ. सुर्वे यांनी आपल्या सहकाऱ्यासमवेत पुजारवाडी येथे जाऊन काट्याकुट्यात पडलेल्या या शिंगरूला बाहेर काढून त्याच्यावर प्राथमिक उपचार केले. दहा-बारा दिवस वय असलेल्या या शिंगरूजवळ त्याची आईही उभी होती. मात्र ओरडण्याशिवाय ती काहीही करू शकत नव्हती. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मानेवर मारल्यामुळे जखमा झालेल्या या शिंगरूवर डॉ. सुर्वे यांनी उपचार करून आपला सेवाधर्म जपला आहे. यापूर्वीही स्टॅन्ड परिसरात गाढव तसेच शिवाजीनगर परिसरात गायींवर वेळीच जागेवर उपचार करून जीवदान दिलेले आहे. पक्षी प्रेमी ग्रुपच्या वतीने त्यांच्या या कार्याबद्दल अभिनंदन करून त्यांचे आभारही व्यक्त केले गेले.



सुराज्य सोलापूर
Classified

पाहिजेत

गरजुंना कायमची कामाची व राहण्याखाण्याची सोय, लॉजमध्ये कायम राहणास कामगार पाहिजेत.
मो.9373980171
(190423)

विवाहविषयक

वधु २६, ५.३, गोरी, १० वी, हिंदु लिंगायत, वडील नाहीत. आई-मुलीचा केटरींग व्यवसाय, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय सामान्य वर चालेल.
मो.7028536999
8446068427
(240423)

## सोपल, बारबोलेंच्या उपस्थितीत महेदवी समाजाची रोजा इफ्तार पार्टी

**बार्शी** : माजी मंत्री दिलीप सोपल व माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहरातील महेदवी मशीद येथे महेदवी समाजाचा रोजा इफ्तार कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक महेदीमिया लांडगे यांनी केले होते.

यावेळी सामुहिकरित्या रोजा सोडल्यांनतर नमाज पठण झाले. यावेळी प्रास्ताविकामध्ये लांडगे यांनी सोपल यांचे मुस्लीम समाजाशी अतुट नाते असून बार्शी तालुक्यातील मुस्लीम समाजाच्या तिन पिढ्यातील कुटूंबांची सोपल यांच्या बरोबर जवळीक आहे. त्यामुळे सोपल यांच्या रमजान ईद व सर्वच धार्मिक कार्यक्रमातील उपस्थितीमुळे समाज बांधवांचा आनंद वाढतो असे सांगितले. यावेळी सोपल यांनी मनोगतामध्ये आपण मुस्लीम समाजाच्या सार्वजनिक समस्या सोडविण्यासाठी कायम वचनबध्द असल्याचे सांगितले.



यावेळी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी या उपक्रमाबद्दल संयोजकांचे कौतुक केले. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष किरण देशमुख, माजी नगरसेवक शंकर देवकर, माजी नगरसेवक वाहीद शेख, अबेद सय्यद, पाशाभाई शेख, बडूभाई लांडगे आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा लांडगे, मोमीन, हन्नुरे, बाबुडे, चौधरी परिवार व महेदवी समाजातर्फे शहेजादे मौलवीसाहब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## नई जिंदगी परिसरातून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर

नई जिंदगी परिसरातील रोशन अपार्टमेंट येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने पळविली. ही घटना १७ एप्रिल रोजी रात्री घडली. या प्रकरणी म.सादिक इब्राहिम कातनघर (वय-५२, रा.नई जिंदगी) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास मणूरे करत आहेत. ही घटना रविवारी दुपारी घडली.

## 'अकलूजकर' अनुभवणार 'आयपीएल'चा थरार

सुराज्य/अकलूज



सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नातून २२ व २३ एप्रिल रोजी अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल मध्ये बीसीसीआई कडून टाटा आयपीएल फॅन पार्कची उभारणी केली जाणार असून क्रिकेट चाहत्यांना विनामूल्य आयपीएलचा थरार अनुभवता येणार आहे.

विविध राज्यांमध्ये क्रिकेट चाहत्यांना विनामूल्य सामने पाहण्यासाठी आयपीएल फॅन पार्क तयार करते. या दरम्यान, मोठ्या स्क्रीनवर थेट सामना दाखला जातो. जिथे बसण्याची व्यवस्था असते, यासोबतच काही उपक्रमही ठेवले जातात. चाहत्यांना आयपीएलशी अधिक बांधून ठेवण्यासाठी आणि स्टेडियमसारखा आनंद देणे हा यामागचा उद्देश आहे असे सोलापूर जिल्हा क्रीकेट असोसिएशनचे ज्वाईट सेक्रेटरी धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी सांगितले. २२ एप्रिल रोजी गुजरात टाईटन विरूद्ध लखनऊ जायंट व मुंबई इंडियन्स विरूद्ध पंजाब इलेव्हन २३ एप्रिल रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगलोर विरूद्ध राजस्थान रॉयल्स तर चेन्नई विरूद्ध कोलकता या आयपीएल मॅचेस रणसंग्राम सर्व वयोगटातील चाहत्यांसाठी करमणुकीच्या विविध पर्यायांसह भव्य स्क्रीनवर विनामूल्य थेट ॲक्शन पहाता येणार आहे.

## डॉ.आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत ५१८ लाभार्थींना अनुदान

**सोलापूर** : अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजने अंतर्गत २०२२-२३ या वर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५१८ लाभार्थींना लाभ दिला आहे. त्याअंतर्गत रक्कम रुपये ४ कोटी ४३ लाख अनुदान देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी परमेश्वर वाघमोडे यांनी दिली.

परमेश्वर वाघमोडे म्हणाले, राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत नवीन विहिरीसाठी २ लाख ५० हजार रूपये, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण १ लाख रूपये, जुनी विहीर दुरूस्ती ५० हजार रूपये, इनवेल बोअरिंग व पंपसंचासाठी प्रत्येकी २० हजार रूपये, वीजजोडणी आकार १० हजार रूपये, तसेच सूक्ष्म सिंचन संच अंतर्गत ठिबक सिंचन संचासाठी ५० हजार रूपये किंवा तुषार सिंचन संचासाठी २५ हजार रूपये या मर्यादेत अनुदान वितरित करण्यात येते. परमेश्वर वाघमोडे म्हणाले, योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौध्द संवर्गातील असावा. शेतकऱ्याच्या नावे किमान ०.२० हेक्टर व कमाल ६ हेक्टर मर्यादित जमीन असावी. नवीन विहिरीचा लाभ घेण्यासाठी किमान ०.४० हेक्टर स्वतःच्या नावे किंवा एकत्रित कुटुंबाची सामूहिक जमीन असावी. नवीन विहिरी व्यतिरिक्त इतर घटकांचा लाभ घेण्याकरिता किमान ०.२० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे. वार्षिक उत्पन्न दीड लाख रूपयांपेक्षा जास्त नसावे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

**जिल्ह्यातील १८ शेतकऱ्यांना लाभ**

अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेचा २०२२-२३ या वर्षी सोलापूर जिल्ह्यातील १८ लाभार्थींना लाभ देण्यात आला असून १०.९० लाख रूपये रूपयांचे अनुदान दिले आहे, असे श्री. वाघमोडे यांनी सांगितले.


## महिलेचा विनयभंग करणाऱ्या पोलिसावर गुन्हा

**सोलापूर** : आपल्या ओळखीतील महिलेच्या घरी जाऊन तिला शिवीगाळ करत तिला मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी पोलिसावर गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी ५२ वर्षीय महिलेने जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.याप्रकरणी सुरज अर्जुन सुरवसे (रा.सहस्त्रार्जून नगर, जुळे सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिसाचे नाव आहे.

पीडिताही घरी आपल्या नातवाला खेळवत होती.तेव्हा तिच्या सुनेने पीडितेला शिवीगाळ करत करण्यास सुरूवात केली.संशयित आरोपी हा पीडितेच्या घरी जाऊन पीडितेला तुझी मस्ती जीवरतो असे म्हणत पीडितेला लज्जा वाटेल असे कृत्य केले.शिवाय पीडितेच्या पोटाला व अवघड जागेवर लाथ मारून जखमी केले. दरम्यान, शेजारील मंडळी आल्यानंतर त्यांना तुम्ही मध्ये पडू नका, नाहीतर तुमच्यावर खोटे केस करून तुम्हाला अडकावेन अशी धमकी दिली. या फिर्यादीवरून सूरज सुरवसे व अन्य एका महिलेवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## शेतीच्या वाटणीवरून लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर** : शेतीच्या वाटणीच्या कारणावरून तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी रॉडने मारून जखमी केले. याप्रकरणी महेश अप्पाराव काळमंडे (वय-३६, रा.वसुंधरा नगर, विनायक नगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पंडित काळमंडे, गौरीशंकर काळमंडे, दयानंद काळमंडे, चिदानंद काळमंडे (सर्व.रा.कलावती नगर, एमआयडीसी) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पवार करत आहेत.ही घटना रविवारी सायंकाळी अविनाश नगर एमआयडीसी येथे घडली.



## पाकणीच्या विकासासाठी एमआयटी प्रोत्साहन देणार : योगेश पाटील

**उत्तर सोलापूर** : पाकणीच्या सर्वांगीण विकास, बचत गट, शेतकरी बचत गट, पक्के रस्ते, डिजिटल शाळा, माती परीक्षण, ऊस उत्पादक शेतकरी गट, सोलर ग्रामपंचायत असे अनेक उपक्रमाच्या माध्यमातून गावाचा विकास करण्यात येणार असल्याचे एमआयटी विश्वशांती गुरुकुल संचलित राष्ट्रीय सरपंच महाराष्ट्र मुख्य समन्वयक योगेश पाटील यांनी म्हटले आहे.

यावेळी प्रकाश महाले, जलकन्या भक्ती जाधव, पुणे विभाग महिला समन्वक, सुनिता कोरे मोहोळ तालुका महिला समनव्यक यांची प्रमुख उपस्थिती होती. पाकनी ग्रामपंचायत च्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी सरपंच बालाजी यलगुंडे,उपसरपंच विजय शिंदे,ग्रामपंचायत सदस्य परिणिता विजयसिंह शिंदे, मनीषा येलगुंडे, सोनाली वाले, मनीषा क्षीरसागर, श्रीकांत येलगुंडे, सदाशिव सलगर, बापूसाहेब गुजर, आबा यादव, आबा कोष्टी, प्रियंका कोष्टी, विजयसिंह शिंदे, नंदकुमार गुंड, वाघमारे, गायकवाड उपस्थित होते.



# सहकारी संस्थेत स्वहित सांभाळणाऱ्यांना हद्दपार करा : पाटील

सुराज्य/अक्कलकोट

**सहकाराचे नाव घ्यायचे आणि आपल्या ताब्यात असलेल्या प्रत्येक सहकारी संस्थेत स्वतःचे आर्थिक हित साधत त्या संस्था डबघाईला आणणाऱ्या भस्मासुराला बाजार समिती निवडणुकीतून हद्दपार करा, असे आवाहन अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांनी व्यक्त केले.**

ते अक्कलकोट बाजार समितीच्या निवडणुकीच्या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. पुढे बोलताना मल्लिकार्जुन पाटील म्हणाले की माझ्या सभापती पदाचा कार्यकाळ संपताना ३१ मार्च २०१७ अखेर २२ लाख ७१ रुपये इतका खत साठा शिल्लक होता.नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आल्यानंतर विद्यमान सभापती संजीव कुमार पाटील आणि संचालक मंडळाने या खत विक्री व्यवहारात अनियमितता आणत खताची विक्री विद्यमान उपसभापती आप्पासाहेब पाटील यांच्या सूचनेप्रमाणे खत विक्री करावे असे ठराव केले. यावर कहर म्हणजे उपसभापती आप्पासाहेब पाटील यांच्याच मालकीच्या मनीषा कृषी भांडार या खत दुकानातल्या शिवशरण गुरण्णा नागणुसरे नावाच्या व्यक्तिंच्या पोचने सदर खत मनीषा कृषी भांडार लाच देण्यात आले.



सदर बाब गंभीर असल्याचे लेखापरीक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०१५ ते १६ ला माझी कारकीर्द संपत असताना कृषी उत्पन्न बाजार समितीत एक कोटी ७५ लाख रुपयांचा बँकेमध्ये ठेव होती. या भस्मासुरांचे सत्तेत आगमन होताच सर्व एफडी गिळंकृत करून मागील पाच वर्षात प्रत्येक वेळी दरवर्षी ० रुपये नफा शिल्लक ठेवण्यात आला आहे. याउलट प्रशासक सत्तेवर येताच पुन्हा बाजार समितीला २० लाख रुपयांचा नफा झालेला आहे. या संचालक मंडळांनी शेतकरी,व्यापारी आणि कष्टकरी यांच्यासाठी दमडी सुद्धा खर्च केला नाही. विशेष म्हणजे कोरोना काळात शेतकऱ्यावर संकट उद्भवून सुद्धा हे बाजार समितीचे संचालक मंडळ त्यांच्यासाठी काहीही योगदान देऊ शकले नाही. सन २०१० ते २०१५ या माझ्या संचालक मंडळाच्या कार्यकाळात बाजार समितीत व्यापारी आणि मार्केट कमिटी यांच्या वतीने दर सोमवारी शेतकरी बांधवाना मोफत जेवणाची सोय केली गेली होती. या पत्रकार परिषदेस कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य आंनद तानवडे, गोकुळ शुगरचे मॅनेजिंग डायरेक्टर कपिल शिंदे, ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन काटगाव, शिंदे गटाच्या शिवसेनेचे तालुकाप्रमुख संजय देशमुख, तुकाराम बिराजदार, शिवयोगी लाळसंगी, व्यंकट मोरे, बसवराज तानवडे, लाला राठोड, दौलतराव मोरे, रामचंद्र अरवत, सुरेश गड्डी, शंकर पाटील, सिद्धाराम भंडारकवठे, प्रकाश दुपारगुडे,अविराज सिद्धे, शिवराज स्वामी, सिद्धार्थ गायकवाड, कार्तिक पाटील, इरसंगप्पा गड्डे, सैपन शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# कार्यकर्त्यांना शब्द दिला, संशयाचे धुके हटवले

## जिवात जीव असेपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच राहणार; भाजपसोबत जाणार नाही : अजित पवार



✔ सुराज्य/मुंबई

राज्याच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय भूकंपाच्या चर्चांना पूर्णविराम देत राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. 'आम्ही आमचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करत आहोत आणि जोपर्यंत जीवात जीव आहे तोपर्यंत पक्षाचंच काम करणार. त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी मनात कोणताही संभ्रम न ठेवता निश्चिंत राहावे,' असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे. अजित पवार हे राष्ट्रवादीतील एका गटासह भाजपसोबत जातील, अशा चर्चांना उधाण आलं होतं. त्यांची भाजप नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा सुरू असून लवकरच याबाबतचा अंतिम निर्णय होईल, असंही बोललं जात होतं.

मात्र, आता अजित पवार यांनी आज नवी मुंबईतील खारघर येथे झालेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यातील नागरिकांच्या मृत्यूला सरकारला जबाबदार धरत टीकास्त्र सोडलं आणि नंतर पत्रकारांसमोर येऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

माझ्याबद्दल आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील माझ्या सहकाऱ्यांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचे काम सुरू आहे. वास्तविक ज्या बातम्या दाखवल्या जात आहेत, त्यामध्ये काही तथ्य नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४० आमदारांच्या सह्या घेण्याचे कोणतेही कारण नाही. आम्ही सगळे राष्ट्रवादीत आहोत आणि राष्ट्रवादीतच राहणार आहोत.

जोपर्यंत माझ्या जिवात जीव आहे तोपर्यंत मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये राहणार, असे सांगत अजित पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून भाजपसोबत जाणार असल्याच्या सुरू असलेल्या चर्चेवर पडदा टाकला. आपण सातत्याने माझ्याबद्दल बातम्या देत आहात, त्यामध्ये यत्किंचित तथ्य नाही, असेही अजित पवार यांनी सांगितले. ते मंगळवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

मी आज नेहमीप्रमाणे ऑफिसला बसलो होतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार नेहमीप्रमाणे कमिटीच्या मिटिंगला आले होते. त्यांची मंत्रालयात कामं होती. मी इकडे होतो म्हणून ते मला भेटायला आले. या आमदारांची माझ्याकडे काही कामं असतात. मात्र, गैरसमज पसरवणाऱ्या बातम्यांमुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक स्तरावरील कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. पण त्यांनी काळजी करू नये. राजकारणात अनेक चढउतार येतात. महत्त्वाच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक बातम्या पसरवल्या जात आहेत. मात्र, आता कोणतेही गैरसमज पसरवू नका. आता या विषयाचा तुकडा पाडा. हा विषय इथेच संपवा, असे अजित पवार यांनी म्हटले.

मी नागपूरची वज्रमूठ सभा आटोपून येत असताना उद्धव ठाकरे यांच्यासोबत विमानातून आलो होतो. यावेळी आमच्यात चर्चा झाली होती. तेव्हा मी त्यांना या सगळ्या चर्चांमध्ये काहीही तथ्य नसल्याचे स्पष्टपणे सांगितले होते, असेही अजित पवार यांनी सांगितले. परंतु, मध्यंतरी मी भाजपमध्ये जाणार अशा बातम्या यायला सुरुवात झाली तेव्हा उद्धव ठाकरे हे मी एकटाही लढेन, असे म्हटले. चुकीच्या बातम्यांमुळे हे गैरसमज निर्माण झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका महाविकास आघाडीत राहण्याची आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची ताकद वाढवणे, हीच आमची भूमिका असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे खासदार संजय राऊत यांनाही टोला लगावला. राष्ट्रवादी काँग्रेसविषयी सुरू असलेल्या चर्चांविषयी बोलायला आमच्या पक्षाचे प्रवक्ते समर्थ आहेत. उगाच दुसऱ्या पक्षाच्या नेत्यांनी आमचे प्रवक्ते म्हणून बोलू नये. त्यांनी त्यांच्या पक्षाची भूमिका मांडावी, आमचे वकीलपत्र त्यांनी घेऊ नये, असा टोला अजित पवार यांनी राउतांना लगावला.

### अजित पवारांच्या पत्रकार परिषदेतील १० मोठे मुद्दे

✻ सध्या आमच्याबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये यत्किंचितही तथ्य नाही. सर्व बातम्या निराधार आहेत. ✻ कारण नसताना माझ्याबद्दल आणि माझ्या इतर सहकाऱ्यांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचे काम जाणीवपूर्वक सुरू आहे. ✻ मी ४० आमदारांच्या सह्या घेतल्या, ही बातमीही खोटी आहे. ✻ आम्ही परिवार म्हणून काम करतो, यापुढेही पक्षाचं काम सुरू ठेवणार. ✻ कार्यकर्त्यांनी संभ्रमित न होता आपआपल्या भागात पक्षवाढीसाठी काम सुरू ठेवावं. ✻ मला आज काही आमदार भेटले. ते त्यांच्या मतदारसंघातील कामांबाबत भेटले, अन्य कोणताही हेतू नाही. ✻ राज्यासमोर बेरोजगारी, महागाई यांसारखे महत्त्वाचे प्रश्न आहेत. अशा प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक अशा चर्चा घडवून आणल्या जात आहेत. ✻ मी राष्ट्रवादी सोडून जाणार नाही, हे पत्रकारांना स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का? ✻ महाविकास आघाडीसोबत राहून ही आघाडी मजबूत करण्याचा निर्णय राष्ट्रवादीने घेतलेला आहे. ✻ मी ट्विटरवरून पक्षाचं चिन्ह हटवलेलं नाही. आता काय कपाळावर पक्षाचं चिन्ह लावून फिरू का?

## शिंदे गटाच्या प्रवक्तेपदी ॲड.शिरसाट

✔ सुराज्य/मुंबई



एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर राज्यात अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. येत्या काही दिवसांत पुन्हा एकदा पहाटेचा शपथविधी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहेत. तर दुसरीकडे विरोधकांकडून राज्यात घडणाऱ्या राजकीय घडामोडी अत्यंत खालच्या पातळीवर जात असल्याचे सांगत शिवसेनेला (शिंदे गटाला) लक्ष केले जात आहेत. पण या सर्वांना उत्तर देण्यासाठी शिंदे गटाकडून दिपक केसरकर यांना पुढे केले जात होते. मात्र, आता याची जबाबदारी एकनाथ शिंदे यांच्याकडून संजय शिरसाट यांना देण्यात आलेली आहे. शिंदे गटातील अनेक गोष्टींबाबत संजय शिरसाट हे गेल्या अनेक दिवसांपासून परखडपणे भूमिका मांडताना दिसून येत आहेत. त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिरसाट यांची आता शिवसेनेच्या प्रवक्ते पदी अधिकृत निवड केली आहे. या संदर्भातील पत्र मुख्यमंत्री शिंदे यांनी संजय शिरसाट यांना दिले आहे.

संजय शिरसाट हे छत्रपती संभाजीनगरच्या पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. ते शिवसेनेच्या तिकिटावर सलग तीन वेळा विधानसभेवर निवडून आलेले आहेत. तसेच, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना त्या सरकारमध्ये उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना संजय शिरसाट यांना मंत्रीपद मिळण्याची अपेक्षा होती. परंतु त्यावेळी त्यांच्याऐवजी संदीपान भुमरे व नव्यानेच शिवसेनेत आलेल्या अब्दुल सत्तार यांना मंत्री करण्यात आले होते. तेव्हापासूनच ते नाराज होते.

दरम्यान, त्यावेळी संजय शिरसाट यांची तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळीक वाढली. आघाडी सरकार असतांना नगरविकास खात्याकडून शिरसाट यांच्या मतदारसंघासाठी शिंदे यांनी भरघोस निधी दिला होता. त्यामुळे जेव्हा शिंदेंनी बंडांचा झेंडा फडकवला तेव्हा त्याला भक्कम साथ शिरसाट यांनी दिली होती.

## सूर्यदेव कोपला

## कागलमध्ये एकाच दिवशी उष्माघाताने तिघांचा मृत्यू

✔ सुराज्य/कोल्हापूर



**कोल्हापूरसह राज्यात उष्णतेची लाट आली असून नागरिक हैराण झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमात उष्माघाताने तब्बल १३ जणांचा मृत्यू झालेला असताना आता कोल्हापुरातील कागल तालुक्यातील आणखी तिघांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे नागरिकांनी गरज पडली तरच बाहेर पडावे असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे.**

कोल्हापुरातील कागल तालुक्यातील बेलवळे खुर्द येथे राहणाऱ्या तिघांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. सोमवारी एकाच दिवसात दोन महिला आणि एका पुरुषाचा मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे.

सोमवारी सकाळी सीताबाई शिवाजी पाटील (वय ५४ वर्ष) या नेहमीप्रमाणे शेतात कामासाठी गेल्या होत्या. सकाळपासूनच शरीराला उन्हाचे चटके लागत असताना देखील त्या शेतात काम करत होत्या. दरम्यान दुपारच्या सुमारास उष्णता वाढल्याने त्या घरी आल्या. तहान लागल्याने त्या पाणी प्यायल्या. नंतर क्षणार्धातच त्यांना चक्कर आली आणि त्या कोसळल्या. अशातच त्यांचा मृत्यू झाला.

अचानक घडलेल्या या प्रकाराने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या मागे एक मुलगा दोन मुली सुना नातवंडे असा परिवार आहे. तर दुसरी घटना सातापा भाऊ पाटील (वय ५२ वर्ष) यांच्यासोबत घडली आहे. त्यांना वाढत असलेल्या उन्हाचा दोन दिवसांपूर्वी त्रास होऊ लागल्याने अस्वस्थ वाटू लागले. त्यांना कोल्हापुरात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र त्यांचेही सोमवारी निधन झाले.

तिसरी घटना ही याच गावातील जनाबाई विठ्ठल कांबळे (वय ८० वर्ष) यांच्यासोबत घडली. वय झाल्याने त्यांना उष्णतेचा जास्त त्रास होऊ लागला. अशातच त्यांना धाप लागू लागल्याने चार दिवसांपूर्वी उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांचाही सोमवारी मृत्यू झाल्याने गाव-वर शोककळा पसरली आहे.

## धक्कादायक पुण्यातील शाळेत दहशतवाद्यांचे प्रशिक्षण केंद्र

✔ सुराज्य/पुणे




पुण्यातील एका शाळेत दहशतवादींचं प्रशिक्षण सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पुण्यातील पीएफआयकडून ब्लू बेल नावाच्या शाळेत दोन मजल्यावर दहशतवादी प्रशिक्षण सुरू करण्यात आलं होतं. तसेच या शाळेत शस्त्रप्रशिक्षण आणि हल्ला करण्याचं ट्रेनिंग पीएफआयकडून दिलं जात होतं अशी माहिती समोर येतेय. परंतु या शाळेवर एनआयएकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे.

या शाळेच्या चौथ्या आणि पाचव्या मजल्याचा वापर हा देशविरोधी कृत्यांसाठी केल्याचा ठपका छखने ठेवला आहे. एनआयएने या शाळेचे दोन मजले सील केले होते. मुस्लीम तरुणांना गळाला लावून त्यांना दहशतवादी प्रशिक्षण देण्यासाठी या शाळेचा वापर केला जात होता. त्यानंतर तातडीने कारवाई करत यूएपीए कायद्यांतर्गत एनआयएने या शाळेचा चौथा आणि पाचवा मजला सील केला.

दरम्यान, २२ सप्टेंबर २०२२ रोजी याच शाळेवर छापे टाकण्यात आले होते. २०४७ पर्यंत भारताला इस्लामिक देश बनवण्याचं पीएफआयचं लक्ष्य आहे. एनआयएने गेल्यावर्षी देशभर पीएफआयच्या तळांवर छापे मारले होते. मोठ्या प्रमाणात देशभर अटकसत्र झालं होतं.

## सुदानमधील संघर्षात २०० नागरिकांचा मृत्यू

✔ **सुदान :** निमलष्करी (आरएसएफ) आणि लष्करी दलांमध्ये झालेल्या संघर्षात सुदानमध्ये तब्बल २०० जणांचा मृत्यू झाला आहे. तर, १८०० लोक जखमी झाल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. लष्करी दल आणि निमलष्करी दल यांचं विलिनीकरण करण्याच्या मुद्द्यावरून सुदानमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. संघर्षामुळे रुग्णालयांचे नुकसान झाले आहे. यासोबतच वैद्यकीय आणि अन्न पुरवठ्यावरही परिणाम झाला आहे.हिंसाचारावेळी हवाई हल्ले आणि जोरदार गोळीबार होताना दिसत आहे. हा हिंसाचार सशस्त्र सेना कमांडर अब्देल फताह अल-बुरहान आणि रॅपिड सपोर्ट फोर्स, जनरल मोहम्मद हमदान डॅगलो यांच्यातील शक्ती संघर्षाचा एक भाग आहे. आठवडाभर चाललेल्या या सत्तासंघर्षाने शनिवारी प्राणघातक हिंसाचाराचे रूप धारण केले.

## दहावीचा निकाल जूनच्या दुसऱ्या आठवड्यात

✔ **मुंबई :** राज्यभरातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची माहिती हाती आली आहे. परीक्षा झाल्यानंतर निकाल कधी लागतो, यासाठी राज्यभरातील लाखो विद्यार्थी वाट पाहतायेत. नुकतीच बोर्डातील अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा निकाल वेळेवरच लागतील. जूनच्या पहिल्या आठवड्यात बारावी बोर्डाचा तर लगेच दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. दरवर्षी ज्या कालावधीत निकाल लागतात, त्याच वेळेला विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे निकाल जाहीर केले जातील, असे राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

## उत्तर प्रदेशात कायदा सुव्यवस्था उत्तम आहे : आदित्यनाथ

✔ **उत्तर प्रदेश :** अतिक आणि अशरफ अहमदच्या हत्येनंतर उत्तर प्रदेशमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. मात्र, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. उत्तर प्रदेशात आता दंगली होत नाहीत. उत्तर प्रदेशात कायद्याचं राज्य आहे. आता कोणताही गुन्हेगार किंवा माफिया कोणत्याही उद्योजकाला धमकावत नाही, उत्तर प्रदेश सरकार तुम्हाला उत्तम कायदा सुव्यस्थेची खात्री देतं, असं योगी आदित्यनाथ म्हणाले.

## पंतप्रधान ऋषी सुनक यांची आयुक्तांकडून चौकशी सुरू

✔ **उत्तर प्रदेश :** ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या अडचणींध्ये भर पडली आहे. कारण त्यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. पार्लमेंट कमिशन फॉर स्टँडर्ड्सद्वारे त्यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. हे प्रकरण ऋषी सुनक यांच्या पत्नी अक्षता मूर्ती यांच्याशी संबंधित आहे. अक्षता मूर्ती या एका चाइल्ड केअर फर्ममध्ये गुंतवणूकदार आहेत. या कंपनीत सुनक यांनी पत्नीची भागिदारी योग्य पद्धतीने जाहीर केली आहे की ती करत असताना नियमांचं उल्लंघन केलं आहे? या संदर्भातली ही चौकशी आहे. पार्लमेंट कमिश्नरच्या वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार १३ एप्रिलपासून ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. आयुक्त डॅनियल ग्रीनबर्ग यांनी ही चौकशी सुरू केली आहे. या चौकशीमुळे विरोधकांच्या हाती आयतं कोलीत मिळालं असून त्यांनी यावर राजकारण तापवण्यास सुरूवात केली आहे.

## अतिक-अशरफ हत्या...सुनावणी घेण्यास कोर्टाची मंजुरी

✔ **उत्तर प्रदेश :** राजकिय क्षेत्रातून कुख्यात गँगस्टर बनलेल्या अतिक अहमदची रविवारी हत्या करण्यात आली. पोलिसांच्या ताब्यात असतानाच अतिक आणि त्याचा भाऊ अशरफ या दोघांवर गोळ्या झाडण्यात आल्या. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. शिवाय आता या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातही सुनावणी होणार आहे. या हत्येप्रकरणी वकिल विशाल तिवारी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. आता सर्वोच्च न्यायालायने याप्रकरणी सुनावणी घेण्यास मंजुरी दिली असून २४ एप्रिलला सुनावणी होणार आहे. या याचिकेचतून विशाल तिवारी यांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या भूमिकेवरच संशय घेतला आहे.

## बिल्किस बानो प्रकरण...

# सुप्रीम कोर्टाने गुजरात सरकारला झापले

### म्हणे, तुम्ही कारण सांगा नाहीतर...

✔ सुराज्य/संभाजीनगर

बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील गुन्हेगारांची गेल्या वर्षी पॅरोलवर मुक्तता करण्यात आली. गुजरात सरकारने घेतलेल्या या निर्णयाचे पडसात देशभर उमटल्याचं पाहायला मिळालं. बिल्किस बानो सामुहिक बलात्कार प्रकरणातील एकूण ११ गुन्हेगारांना शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, गुजरात सरकारने ही शिक्षा पूर्ण होण्याआधीच या गुन्हेगारांना १५ ऑगस्ट २०२२ रोजी पॅरोलवर सोडलं. गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणीवेळी न्यायालयाने गुजरात सरकारला फैलावर घेतलं.

बिल्किस बानो यांनी गुजरात सरकारच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. शिक्षा पूर्ण होण्याआधीच गुन्हेगारांची मुक्तता करण्यात आल्यामुळे समाजाच्या मूलभूत मानवी तत्वांनाच धक्का बसला आहे, असं बिल्किस बानो यांनी याचिकेत म्हटलं होतं. २७ मार्च रोजी त्यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती के. एम. जोसेफ आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी चालू आहे. यावेळी न्यायालयाने गुजरात सरकारला परखड शब्दांत सुनावलं.

### गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेणे गरजेचे होते

न्यायालयाने यावेळी गुजरात सरकारला सुनावताना महत्त्वाच्या मुद्द्यांवर टिप्पणी केली. राज्य सरकारने या गुन्हेगारांची पॅरोलवर मुक्तता करताना संबंधित गुन्ह्याची तीव्रता लक्षात घेणं गरजेचं होतं, असं न्यायालयाने नमूद केलं. फक्त केंद्र सरकारनं राज्य सरकारच्या निर्णयाला मान्यता दिली याचा अर्थ राज्य सरकारने या प्रकरणात स्वत: विचारच करायचा नाही असा होत नाही, असंही न्यायालयाने यावेळी म्हटलं.




इथे प्रश्न हा आहे की राज्य सरकारने यावर काही विचार केला की नाही? हा निर्णय राज्य सरकारने कोणत्या पुराव्यांच्या आधारे घेतला? न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून शिक्षा सुनावली तेव्हा त्यात हे गुन्हेगार पुढील आयुष्यभर तुरुंगात राहाणं अपेक्षित होतं. पण त्यांना सरकारच्या आदेशांनी सोडून देण्यात आलं. आज या महिलेच्या (बिल्किस बानो) बाबतीत हे घडतंय. उद्या तुम्ही किंवा मीही तिच्या जाही असू शकतो. त्यामुळे यासंदर्भात निर्णय घेताना निश्चित अशी नियमावली असायला हवी. जर तुम्ही आम्हाला याचं कारण दिलं नाहीत, तर आम्ही आमच्या पद्धतीने यावर निष्कर्ष काढू, अशा शब्दांत न्यायालयानं गुजरात सरकारला ठणकावलं आहे.

### नेमकं प्रकरण काय?

गुजरातमध्ये २००२ साली झालेल्या दंगलींवेळी हा गुन्हा घडला होता. ३ मार्च २००२ रोजी बिल्किस बानो यांच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. गुजरातच्या डाहोद जिल्ह्यातील लिमखेडा तालुक्यात दंगलींमध्ये मृत्युमुखी पडलेल्या एकूण १४ जणांमध्ये बिल्किस बानो यांची तीन वर्षांची चिमुकली मुलगीही होती.



## युवासेनेच्या दक्षिणमधील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

**सोलापूर** : युवासेनेच्या (ठाकरे गट) सोलापूर शहर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी युवासेनेमध्ये सोलापूर शहर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध युवकांनी जिल्हाप्रमुख अमर पाटील, युवासेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. नियुक्त्या पुढीलप्रमाणे: युवासेनेच्या शहर व ग्रामीण सचिवपदी प्रशांत देडे, सोशल मिडिया समन्वयकपदी अजित स्वामी, शहर सहसचिवपदी ओंकार उदावंत, शहर दक्षिण समन्वयकपदी आकाश घोरपडे, चिटणीसपदी संकेत गोटे, उपप्रमुखपदी शुभम वानकर, शुभम भोपळे, अनिकेत राठोड, द. सोलापूर उपतालुकाप्रमुखपदी आकाश मुगळे, सतीश तोरनगी, प्र. क्र. २३ च्या विभागप्रमुखपदी अभिषेक राठोड, प्र. क्र. २५ च्या विभागप्रमुखपदी राकेश माळकोठे, होटगी विभागप्रमुखपदी रमेश मंजलेकर, माळकवठा विभागप्रमुखपदी पंचाक्षरी बगले. यावेळी शहरप्रमुख विठ्ठल वानकर, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, रमेश चौगुले, राहुल गंधुरे, रोहित तडवळकर, तुषार आवताडे, तपासे, रतन खैरमोडे, नितीन काटकर, अमोल लवटे उपस्थित होते.

## भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी वीरेंद्र हिंगमिरे यांची पुनश्च निवड



**सोलापूर** : सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या २३ वर्षांपासून कार्य करीत असलेल्या भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी उद्योजक, समाजभूषण वीरेंद्र हिंगमिरे यांची दुसऱ्यांदा निवड झाली आहे. कार्यकारिणीच्या वार्षिक बैठकीत संस्थेचे संस्थापक बाबा बाबरे यांनी ही घोषणा केली. संस्थेचे नवीन पदाधिकारी पुढीलप्रमाणे:- अध्यक्ष- वीरेंद्र विश्वनाथ हिंगमीरे, कार्याध्यक्ष-अँड.विशाल म्हस्के,उपाध्यक्ष-भीमराव माने, सचिव-अकबर शेख,कोषाध्यक्ष-सिध्दांत बाबरे, सहसचिव-वैभव लोखंडे व अजय गायकवाड.सल्लागार समितीतील पद्म राका, डॉ. रावसाहेब पाटील, राजेंद्र शहा (कांसवा), डॉ. उदय वैद्य, सचिन गायकवाड,किरण गायकवाड यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



# सोलापूर @४१.८ शुकशुकाट



सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहराच्या कमाल तापमानात मागील आठवड्याभरापासून सातत्याने वाढ होत आहे. मंगळवारी तापमानाने ४१.८ अंश गाठले. उन्हाची काहिली वाढल्यामुळे नागरिकांना चटके बसत आहेत.**

मंगळवारी यंदाच्या हंगामातील सर्वोच्च म्हणजे ४१.८ अंश सेल्सियसवर तापमान स्थिरावले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहराचे सातत्याने ४० अशांच्या पुढे जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाची लाही लाही होत आहे. मंगळवारी सकाळपासूनच अंगाला चटके बसत होते. दुपारच्या सुमारास तर उन्हाचा कडाका आणखी वाढला. वाढत्या उन्हामुळे सोलापूरकर घरीच बसणे पसंत करताना दिसत आहेत. नेहमी गजबजलेला असलेला सात रस्ता परिसर मंगळवारी दुपारी सामसूम दिसत होता. तापमानात वाढ झाल्याने नागरिकांना उन्हाच्या झळा बसताना दिसत आहे . त्यामुळे शरीरात उष्णतेचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे. चक्कर येणे, डोकेदुखी, त्वचेच्या विकारात उन्हाळ्यात वाढ होत भरपूर पाणी पिल्यास डिहायड्रेशनचे प्रमाण कमी होते. त्यामुळे आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे. वाढत्या उन्हामुळे रसाळ फळांना मागणी वाढली आहे. प्रत्येक चौकात नागरिक थंडगार ज्यूस, नारळ पाणी पिताना दिसत आहेत.

## शहरातील बोगस नळधारकांच्या विरोधात कारवाईचे महापालिकेसमोर आव्हान

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरात अनेक कुटुंबियांकडे बोगस नळ असण्याची शक्यता आहे तर काहीजण इतर नळ धारकांकडून पाणी घेतात. याकडे आता महापालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घातले आहे. सर्व्हेक्षणात आणखी बोगस नळ निदर्शनास येतील मात्र बोगस नळधारकांच्या विरोधातील कारवाईचे मोठे आव्हान महापालिकेसमोर राहणार आहे. दरम्यान, कारवाईमुळे बोगस नळ धारकांचे टेन्शन मात्र वाढले आहे.

महापालिका आता शहरातील बोगस नळ कनेक्शनचा घेऊन पाणी चोरी करणाऱ्या नागरिकांवर कारवाई करणार आहे. यासाठी महापालिकेच्या कर्मचारी पथकाच्या माध्यमातून शहरातील बोगस नळ कनेक्शनचा शोध घेतला जाणार आहे. महापालिकेने शहरातील प्रत्येक कुटुंबियांना पालिकेच्या माध्यमातून नळ कनेक्शन दिले आहेत. जवळपास शहरात १ लाख ३० हजारांच्या आसपास अधिकृत नळ जोडण्या आहेत. मात्र मिळकती २ लाख ९५ हजार आहेत. त्यामुळे बोगस नळ कनेक्शनधारकांची संख्याही काही कमी नाही, असे दिसून येत आहे. त्यांच्यासमोर आता अडचणी निर्माण झाल्या आहेत. मात्र महापालिका नागरिकांची बोगसगिरी समोर आणणार आहे. यामुळे अनेक दिवसांपासून चाललेला पाण्याचा बेकायदेशीर वापर उघड होणार आहे.

**राजकीय हस्तक्षेपातून दबाव येण्याची शक्यता**

यापूर्वी शहरात सार्वजनिक नळावरील पाणी लोक भरत होते. मात्र आता विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सार्वजनिक नळ बंद करण्याची अट शासनाने घातले आहे. घर तिथे नळ योजना राबवावी असे आदेश शासनाने दिले आहेत. यामुळे अनधिकृत नळधारकांना आता अधिकृतपणे नळ जोडणी घेणे बंधनकारक होणार आहे. मात्र हे करत असताना राजकीय हस्तक्षेप होतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर दबाव येतो हा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यामुळे बोगस नळधारकांविरोधात कारवाईचे मोठे आव्हान प्रशासनाच्या पुढे आहे.



मनपा हद्दीतील नागरिकांना नळ कनेक्शनच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. यासाठी त्यांच्याकडून पाणीपट्टी घेतली जाते. मात्र, अनेकजण अनधिकृत नळ कनेक्शनद्वारे पाणी वापर करत असल्याचे आढळून आले आहे. अशा मंडळींवर चाप बसण्यासाठी मनपा आयुक्त शीतल तेली - उगले यांनी मोहीम घेतली आहे.

तत्कालीन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या कार्यकाळात महापालिका प्रशासनाकडून वॉटर ऑडिट करण्यात आले होते. मिळकतीच्या संख्येपेक्षा नळ कनेक्शनची संख्या कमी आढळून आली होती. साधारणतः ६० हजार कुटुंबियांकडे नळ नाहीत मात्र ते इतरत्र पाणी घेतात. अशा कुटुंबियांना अधिकृत नळ जोडणी घेण्याचे आवाहन त्यावेळी केले होते. मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता.

## पाणी गळती शोधून दुरुस्ती करण्याचे आयुक्तांनी दिले आदेश

**सोलापूर** : सोलापूर शहरात विविध ठिकाणी दूषित, पिवळे पाणी येत असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आलेल्या आहेत. आलेल्या तक्रारींची शहानिशा करावी. शहरातील पाणी गळती दुरुस्ती करून स्वच्छ पाणी देण्याचे आदेश दिल्याची माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

सोलापूर शहरातील दमाणी नगर, चंडक नगर, विजापूर रोड भाग यासह विविध ठिकाणी दूषित पाणी आल्याच्या तक्रारी पालिकेला प्राप्त झाल्या. त्याचबरोबर पाण्यात अळयाही आढळल्या आहेत. याविषयी आयुक्त म्हणाल्या, काही ठिकाणी पिवळसर पाणी, अळयायुक्त पाणी येण्याच्या तक्रारी येत आहेत. अशा तक्रारी आल्यास तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. तसेच ज्या ज्या ठिकाणी जलवाहिनी गळती लागलेली आहे त्याची दुरुस्ती तातडीने करावी. शुद्ध पाणीपुरवठा करावा, असे आदेशही दिले आहेत.

## मैत्रनाथ रेजन्सीत घर फोडले; रोख रकमेसह १ लाख ६० हजारांचा ऐवज लंपास

**सोलापूर** : घरातील मंडळी परगावी गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घर फोडून घरातील १ लाख ५९ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१२ ते १६ रोजी मैत्रनाथ रेजन्सी भवानी पेठ येथे घडली. याप्रकरणी जयराम यशवंत भिडे (वय-६०, रा.मैत्रनाथ रेजन्सी, भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. भिडे व त्यांच्यापत्नी कणकवली येथील त्यांची मुलगी नेहा हिच्याकडे गेले होते. त्यावेळी चोरट्याने परगावी गेल्याचा फायदा घेत गज तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील बेडरूम मधील दोन लोखंडी कपाटाचे लॉक उचकटून कपाटामधील सोन्याचे गंठण, कानातील फुले, रोख रक्कम व इंग्लंड पॉऊंड असा एकूण एक लाख साठ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पो.स.ई. ताकभाते हे करीत आहेत.

**टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वराचा मृत्यू**

**सोलापूर** : बाळे येथील सर्व्हिस रोडवरून दुचाकीने जात असताना टेम्पोने धडक दिल्याने आकाश अशोक नलावडे (रा. चिंचोळी) यांचा १७ एप्रिल रोजी मृत्यू झाला होता.या प्रकरणी निशांत मरगू पवार (वय-२०,रा. चिंचोळी काटी) यांच्या फिर्यादीवरून टेम्पो चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

## तरूणाला मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर** : शिवीगाळ करत दमदाटी करत दारूची बॉटल फोडून त्या बाटलीने तरूणाला मारून जखमी केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे.या प्रकरणी बाळकृष्ण अंबादास मङ्डूर (वय-३६, रा.व्यंकटेश नगर, जुना कुंभारी नाका) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. राजू संचाल त्याची आई, भाग्य संचाल यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## वटवृक्ष देवस्थानचा पालखी सोहळा उत्साहात

**अक्कलकोट** : दत्त अवतारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४५ व्या पुण्यतिथी निमित्त पालखी सोहळा मिरवणूक मोठ्या उत्साहाने संपन्न झाला. हजारो भक्तगणांच्या सहभागाने या पालखी सोहळ्यात स्वामी भक्तीचा सुगंध वाहून स्वामींचा पालखी सोहळा रंगला होता.

वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने सायंकाळी साडे पाच वाजता मंदिरातून पालखी मिरवणुकीस प्रारंभ झाला.





प्रारंभी चोळप्पा महाराजांचे वंशज देवस्थानचे पुरोहित मोहनराव पुजारी, मंदार महाराज पुजारी यांचे हस्ते श्रींची आरती झाली. यानंतर चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे व कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते पालखी पूजन होऊन प्रस्थान झाले. पालखी सोहळ्याचे चौकाचौकात भाविकांनी रांगोळी व गुलाबपुष्पांच्या उधळणासह स्वागत करून दर्शन घेतले. स्वामी पुण्यतिथी निमित्त मा.आमदार सिद्धाराम म्हेत्रे, अमोलराजे भोसले, आ.सचिन दादा कल्याणशेट्टी आदी विविध मान्यवरांनी श्रींचे दर्शन घेतले. यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, दयानंद हिरेमठ, प्रदीप झपके, विजय दास, श्रीशैल गवंडी, प्रसन्न हत्ते, नागनाथ जेऊरे, प्रमोद हिंडोळे, शिवानंद स्वामी, प्रदीप हिंडोळे व कर्मचारी व सेवेकरी उपस्थित होते.

# बाजार समितीच्या निवडणुकीत आमचे धनाजी संताजीच तुम्हाला पुरुन उरतील : मोहिते-पाटील

सुराज्य/अकलूज

**चिलटं आणि डास मारायला तोफा रणगाड्यांची आवश्यकता नसते. आमच्या कार्यकर्त्यांना कमी लेखू नका आमचे धनाजी संताजीच तुम्हाला पुरुन उरतील असा टोला सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी लगावला आहे.**



अकलूज कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या संचालक मंडळ निवडणुतील विजयसिंह मोहिते-पाटील पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते नारळ फोडून करण्यात आला, यावेळी जयसिंह मोहिते-पाटील बोलत होते. याप्रसंगी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते पाटील,आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. राम सातपुते, धैर्यशिल मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, बाबाराजे देशमुख,प्रकाश पाटील,प्रताप पाटील, मामासाहेब पांढरे, बी.वाय राऊत,संदीप पाटील, संग्रामसिंह जहागिरदार, माऊली पाटील, बाजीराव काटकर, लखन चव्हाण आदीसह पॅनलचे सर्व उमेदवार व कृषी उत्पन्न बाजार समितीचे मतदार उपस्थित होते.

पुढे बोलताना जयसिंह मोहिते-पाटील म्हणाले विरोधकात हिंमत असती तर ते अरक्षित जागेवर उभे राहीले नसते. आमचे संताजी आणि धनाजी तुम्हाला सळो की पळो करुन सोडल्याशिवाय राहणार नाहीत,या निवडणुकीत विरोधकांना त्यांची जाग दाखवुन द्यायची आहे.

आ.राम सातपुते म्हणाले, या निवडणुकीत पुढे कुणीही असले तरी सामना फाटी वडूनच होईल.खोटा जातीचा दाखला मिळवुन आरक्षित जागेवर उभे राहिलेल्या विरोधकांनी या तालुक्यात किती संस्था उभ्या केल्या हे सांगावे. मोहिते-पाटीलांनी बंद पडलेल्या संस्था चालू करुन दाखवल्या आहेत.

धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले,विरोधकांनी तालुक्यात किती संस्था उभ्या केल्या हे अगोदर सांगावे मंगच सहकारावर बोलावे. मोहिते-पाटील विरोधक या निवडणुकीत एकत्र आले आसले तरी त्याच्यात एकवाक्यता नाही. बाजार समीतीवर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्यांना या निवडणुकीत एकदाच मोळी बांधुन मार्गी लावा असे म्हणत विजयसिंह मोहिते-पाटील पॅनलच्या उमेदवारांची नावे घोषीत केली.यावेळी मदनसिंह मोहिते-पाटील, बाबाराजे देशमुख, मामा पांढरे, संग्रामसिंह जाहगिरदार, बाजीराव काटकर,प्रकाश पाटील, डॉ.लोखंडे,संदीप पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. आभार व्यक्त करताना आ.रणजितसिंह मोहिते-पाटील म्हणाले निवडूणका आल्या पुरतेच आम्ही कामे करत नाही. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या झालेल्या पंचनाम्याचे आदेश दिले आसून लवकरच पंचनामे होतील आशी माहिती दिली.

## सणापूर्वी एक दिवस आधी पाणीपुरवठा करा : चंदनशिवे

सुराज्य/सोलापूर



विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त, रमजान ईद, महात्मा बसवेश्वर जयंती, अक्षय तृतिया या सणानिमित्त १ दिवस आधी पाणीपुरवठा करा, अशी मागणी आनंद चंदनशिवे यांनी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्याकडे केली आहे. मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा सण, त्याचप्रमाणे हिंदू बांधवांचा अक्षय तृतीया हा सण आहे. महात्मा बसवेश्वर जयंती त्याचप्रमाणे २३ रोजी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भीम जल्लोष साजरा करण्यात येणार असून सदर दिवशी महापालिकेकडून जे पाणीपुरवठा होणार आहे ते पाणीपुरवठा नागरिकांच्या सोयीसाठी १ दिवस अगोद करावा, असे चंदनशिवे यांनी म्हटले आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; तरुणावर गुन्हा दाखल



**सोलापूर** : तेरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीला हॉस्टेलवरून नेत तिच्यावर अत्याचार करत, तिला गर्भवती केल्याप्रकरणी संग्राम करे (रा.इंदापूर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पीडितेने फिर्याद दिली आहे. पीडिता ही शिक्षणासाठी इंदापूर येथील हॉस्टेलवर राहत होती. आरोपीने नातेवाईक असल्याचे सांगून तिला हॉस्टेलवरून बाहेर घेऊन जात तिच्यावर वारंवार अत्याचार केला. या घटनेची माहिती कोणालाही सांगून नको मी तुझ्यासोबत लग्न करणार आहे, असे सांगितले. त्यानंतरही त्याने वारंवार अत्याचार केला. दरम्यान,शाळेला सूट्ट्या लागल्याने पीडिता ही घरी रहायला गेली. दरम्यान,तिचे पोट दुखू लागल्याने तिच्या आईने तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात घेतल्यानंतर ती पाच महिन्याची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, तिला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.याप्रकरणी आरोपी संग्राम करे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## नियमांचे उल्लंघन; बस चालकावर गुन्हा

**सोलापूर** : छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँन्ड परिसरात हयगयीने व निष्काळजीपणे वाहन चालवून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी बस चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.जाकीर हुसेन नजीस सय्यद (वय-२९, रा.गुलवंची,उत्तर सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या चालकाचे नाव आहे.याबाबत निलकंठ तोटदार (दक्षिण शहर वाहतूक शाखा) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना सोमवारी दुपारी घडली.